रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १५ ◆ अंक २७१
www.ramprahar.com
# राम प्रहर
गुरुवार, २० एप्रिल २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

आमदार साळवींची दुसऱ्या दिवशीही एसीबीकडून चौकशी/२
पेणमधील सात ग्रामपंचायतींना आयएसओ मानांकन/५
आरपीएलमध्ये रायगड वॉरियर्स संघ विजेता/८

## शेतकऱ्यांसाठी राजपत्रित अधिकाऱ्यांकडून एक दिवसाचे वेतन




**मुंबई** : राज्यात अवकाळी पाऊस आणि गारपिटीने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. हातातोंडाशी आलेले पिक गेल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. राज्य सरकारकडून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रयत्न सुरू आहे. दुसरीकडे राजपत्रित अधिकाऱ्यांनी एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये देण्याचे जाहीर केले आहे. एप्रिल महिन्यातील एक दिवसाचा पगार हा मुख्यमंत्री निधीत जमा केला जाणार असल्याची माहिती राजपत्रित अधिकारी महासंघाचे अध्यक्ष विनोद देसाई यांनी सांगितले. महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ हा राज्यातील विविध खात्यातील राजपत्रित अधिकाऱ्यांच्या ७० खातेनिहाय संघटनांची शिखर संघटना आहे. राज्य सरकारच्या अखत्यारीत असलेल्या विविध खात्यांमध्ये जवळपास दीड लाख राजपत्रित अधिकारी आहे.

# राज्यात उष्णतेची लाट

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील तापमानात वाढ होत आहे. अनेक ठिकाणी तापमानाचा पारा ४०अंशांच्या आसपास गेला आहे. या पार्श्वभूमीवर हवामान विभागाने अलर्ट जारी केला आहे. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारनेही एक कृती आराखडा तयार केला आहे.




**बहुतांश ठिकाणी पारा चाळीशीपार; राज्य सरकारचा कृती आराखडा तयार**

राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने या वर्षीच्या उन्हाळ्यापूर्वी जारी केलेल्या उष्णतेच्या लाटेचा सामना करण्यासाठी कृती आराखड्यात काही निर्देश जारी करण्यात आले आहेत. त्यामध्ये ५० वर्ष किंवा त्याहून अधिक वयाचे कर्मचारी आणि मजूरांनी या उष्णतेच्या काळात काळजी घ्यावी. ज्या नागरिकांना बीपी आणि मधुमेहासारखे आजार आहेत (जे लोक बस ड्रायव्हर आणि पोलीस हवालदार) त्यांच्या कामाच्या योग्य वेळांमध्ये बदल केला जाईल. परीक्षांव्यतिरिक्त शाळा आणि कॉलेज हे सकाळच्या वेळेत भरवता येईल. मजुरांसाठी कामाच्या सुरक्षित वेळा ठेवाव्यात. यामध्ये सकाळ आणि संध्याकाळच्या वेळेला प्राधान्य द्यावे. उष्णतेचा त्रास होणाऱ्या लोकांसाठी सरकारी रुग्णालयांमध्ये स्वतंत्र वॉर्ड राखून ठेवावेत, अशा सूचना राज्य सरकारने केल्या आहेत.

हवामान विभागाने दिलेल्या अलर्टमध्ये म्हटले की, रायगड, ठाणे, रत्नागिरी, पुणे, सोलापूर, धाराशिव, लातूर, नांदेड, हिंगोली, धुळे, अमरावती, नागपूर, वर्धा चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात ४० अंश सेल्सिअसच्या पुढे नोंदवले गेले आहे. त्यामुळे उन्हाची तीव्रता कमी होईपर्यंत घराबाहेर पडणे, शारीरिक कष्टाची कामे टाळावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

### राज्य सरकारचा शेतकऱ्यांना दिलासा

# आता दिवसाही वीज मिळणार!

**मुंबई : प्रतिनिधी**

**उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती**

राज्य मंत्रिमंडळाची बुधवारी (दि. १९) बैठक झाली. या बैठकीत शेतकऱ्यांना दिलासा देणारा आणखी एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार आता शेतकऱ्यांची दिवसा वीज मिळण्याची मागणी पूर्ण होणार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांशी बोलताना ही माहिती दिली.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सोलर प्रोजेक्टसाठी काही खासगी आणि सरकारी जमिनी घेण्यात येतील. ३० वर्षानंतर त्यांची जमीन त्यांना परत मिळेल, दरवर्षी यामध्ये तीन



टक्क्यांनी वाढ होईल. जो काही फीडर आहे त्याच्या पाच किमीच्या भागातील कुठलीही खासगी जमीन यासाठी घेणार आहोत, तसेच सरकारी जमीन असेल तर पाच-दहा किमी क्षेत्रातील जमीन आम्ही घेणार आहोत. यामुळे मोठ्या प्रमाणावर जमीनीची उपलब्धता होईल, त्याचा फायदा असा की, सोलरकरीता आमच्याकडे आज मोठ्या प्रमाणावर इन्व्हेस्टर्स आहेत, त्यांचे प्रोजेक्ट या ठिकाणी करता येतील.

आज आपण शेतकऱ्याला जी वीज देतो ती सात रुपयांची आपल्याला पडते त्यासाठी आपण दीड रुपया वसूल करतो. बाकी आपण सबसिडी देतो. आता ही सोलरची जी वीज आहे ती दिवसा तर मिळेलच पण ही साधारण तीन रुपयांपासून तीन रुपये ३० पैशांपर्यंत पडणार आहे. म्हणजे आज जी सबसिडी आपण देतो त्यात मोठ्या प्रमाणावर घट होईल, तसेच कोळशापासून वीजनिर्मिती करताना पर्यावरणाची हानी होते ती होणार नाही. देशात असा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असेल. सरकारच्या या नव्या योजनेद्वारे शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवण्याची मागणी पूर्ण होईल, असेही या वेळी फडणवीस यांनी म्हटले आहे.

## जाहीर पक्षप्रवेश




(छाया : शामकांत नेरपगार)

**रोहा : तालुक्यातील पुई येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी भाजप रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला. या वेळी आमदार रविशेठ पाटील, माजी आमदार धैर्यशील पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते. (सविस्तर वृत्त उद्याच्या अंकात..)**

## राज्यात दिव्यांगांना पदोन्नती आरक्षण धोरण लागू



**मुंबई** : राज्यात केंद्राप्रमाणे दिव्यांग पदोन्नती आरक्षण लागू करण्याचा त्याचप्रमाणे दिव्यांग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीसाठी चार टक्के आरक्षण लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

केंद्र शासनाच्या १७ मे २०२२च्या आदेशाप्रमाणे राज्यात दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट ड ते गट अ च्या निम्न स्तरापर्यंत पदोन्नती आरक्षण लागू करण्यात येईल. दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट ड मधून गट ड मधील, गट ड मधून गट क मधील, गट क मधून गट क मधील, गट क मधून गट ब मधील, गट ब मधून गट ब मधील तसेच गट ब मधून गट अ मधील निम्नस्तरापर्यंत चार टक्के आरक्षण देण्यात येईल. रिक्त पद असल्यास चार टक्के पदे दिव्यांगांसाठी आरक्षित ठेवण्यात येतील.

अपंगत्वाच्या वेगवेगळ्या प्रकारनिहाय एकूण आरक्षण चार टक्के राहिल. ज्या संवर्गात सरळ सेवेने नियुक्तीचे प्रमाण ७५ टक्क्यांपेक्षा जास्त नसेल अशाच संवर्गात दिव्यांगांना पदोन्नतीत आरक्षण राहिल. या संदर्भातील अन्य सर्व शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहेत.

## नामनिर्देशनपत्रासोबत जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ

**मुंबई** : ग्रामपंचायत, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या राखीव जागांकरिता नामनिर्देशनपत्रासोबत जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. आता ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, अध्यक्ष आणि सभापती पदाच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र ३१ डिसेंबर २०२३पर्यंत भरता येतील.

या जागांवर निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या मागासवर्गीय उमेदवारांना नामनिर्देशनपत्रासोबतच जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करावे लागते.

नामनिर्देशप्रमाणपत्राअभावी निवडणूक लढवण्यापासून वंचित राहू नये म्हणून जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास काही कालावधी मिळावा म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे.

## महाप्रित उपकंपनीमार्फत विविध प्रकल्पांची कामे होणार

**मुंबई** : महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) उपकंपनीमार्फत विविध प्रकल्पांची कामे करून वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत विविध अनुदान, बिज भांडवल, कर्ज योजना राबवण्यात येतात. त्यादृष्टीने महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) या उपकंपनीची स्थापना २०२१ मध्ये करण्यात आली.

या उपकंपनीमार्फत सध्याचे आधुनिक तंत्रज्ञान उपयोगात आणून विविध नवीन योजना राबवण्यात येत आहेत. यामध्ये अक्षय ऊर्जा आणि इलेक्ट्रीक चार्जिंग केंद्र, कृषि प्रक्रिया मुल्य साखळी आणि जैव इंधन आणि पायाभूत सुविधा प्रकल्प, डेटा सेंटर, परवडणारी घरे, ऊर्जा कार्यक्षमता, महिला उद्योजकता, पर्यावरण आणि हवामान बदल, आरोग्य व जैवविज्ञान, कार्पोरेट समुदाय विकास असे प्रकल्प राबवण्यात येत आहेत. यामुळे वंचित घटकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होईल. त्याचप्रमाणे दुर्बल घटकांच्या जीवनमानात सुधारणा होईल.

## निवडक


### पुणेकरांना मालमत्ता करात मनपाकडून ४० टक्के सवलत

**पुणे** : महापालिकेमार्फत स्वतःच्या मालकीच्या घरात राहत असल्यास घरपट्टीमध्ये ४० टक्के सवलत पुन्हा सुरू करण्यात येणार असल्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. याबाबत पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी अधिवेशन काळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन निर्णय घेण्यात आला होता. या निर्णयावर मंत्रीमंडळ बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आले.

### छोटा राजनचा साथीदार सीबीआयच्या जाळ्यात

**नवी दिल्ली** : अंडरवर्ल्ड डॉन छोटा राजनचा अत्यंत जवळचा साथीदार संतोष सावंत उर्फ अबू सावंत याला केंद्रीय अन्वेषण यंत्रणा (सीबीआय) आणि मुंबई गुन्हे शाखेच्या संयुक्त कारवाईनंतर त्याला सिंगापूरमधून हद्दपार करून दिल्लीत आणण्यात आले. अबू सावंत बऱ्याच वर्षांपासून फरार होता.

## समृद्धी महामार्गावर आता वेग नियंत्रणासाठी एक्झिट मॅनेजमेंट सिस्टीम



**नागपूर : प्रतिनिधी**

समृद्धी महामार्गावरील अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी परिवहन विभागाने टायर कालबाह्य झालेल्या वाहनांना समृद्धी महामार्गावर धावू न देता परत पाठवले जाणार आहे, तर एक्झिट मॅनेजमेंट सिस्टीमद्वारे वाहनांच्या ओव्हरस्पीडवर पाळत ठेवली जात आहे.

तुमच्या टायरचे खूप जास्त घर्षण झाले असेल आणि त्याने १.६ एमएम थिकनेस मर्यादा ओलांडली असेल तर परिवहन विभागाचे पथक तुम्हाला समृद्धी महामार्गावरून प्रवास करण्यास मज्जाव करू शकते. समृद्धी महामार्गाच्या एंट्री पॉईंट आणि एक्झिट पॉईटवर वाहनाने कापलेले अंतर किती वेळात पूर्ण केले यावरून वाहनाचा वेग काढला जातो आणि जर का वेग मर्यादेचे उल्लंघन केले असल्याचे आढळल्यास त्या वाहनावर कारवाई म्हणून त्याचे २० मिनिटे थांबवून उद्बोधन केले जाते.

यासाठी परिवहन विभागाने समृद्धी महामार्गावर नागपूर, जालना, वेरूळ व कारंजा लाड या चार ठिकाणी परिवहन विभागाचे पथक नेमले असून तेथे वाहनांची टायर तपासणी आणि एक्झिट मॅनेजमेंट सिस्टीमने वाहनाच्या वेगावर पाळत ठेवली जात आहे. आतापयत या मोहिमेंतर्गत ६४ वाहनांवर एक्झिट मॅनेजमेंट सिस्टीमने कारवाई केली. २९४ वाहनांच्या टायरची स्थिती तपासण्यात आली. नियमांचे पालन करा आणि अपघात टाळा याच मूलमंत्राचे पालन करणे हाच यावर रामबाण उपाय आहे.

# आरओ प्लांटमुळे विद्यार्थ्यांना शुद्ध पाणी उपलब्ध

**लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केले समाधान**



(छाया : योगेश पाटील)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व जनार्दन आत्माराम भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्य रत्नप्रभा अरुण घरत यांच्या २०२१-२२मधील १५वा वित्त आयोगच्या निधीतून आरओ प्लांट उभारणी व गव्हाण ग्रुप ग्रामपंचायतीच्या निधीतून पत्राशेड उभारण्यात आली आहे. या कामाचे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी (दि. १९)झाले.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आरओ प्लांटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी शुद्ध पाणी उपलब्ध होणार असल्याने समाधान व्यक्त केले.

पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्या तथा भाजप महिला मोर्चाच्या पनवेल तालुका अध्यक्षा रत्नप्रभा घरत यांच्या पाठपुराव्यामुळे अनेक कामे मार्गी लगत आहेत. त्यानुसार त्यांच्या १५वा वित्त आयोग २०२१-२२च्या निधीतून श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व

**माजी पं. स. सदस्य रत्नाताई घरत यांचा पुढाकार**

जनार्दन आत्माराम भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये आरओ प्लांट तसेच गव्हाण ग्रुप ग्रामपंचायतीच्या निधीतून पत्राशेड उभारण्यात येणार आहे. चार लाख ७६ हजार ५०० रुपये खर्चून आरओ प्लांट तर दोन लाख ५३ हजार ७४७ रुपये शेड उभारण्यासाठी खर्च करण्यात येणार आहेत.

या वेळी रयतचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य आबासाहेब देशमुख, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, गव्हाणच्या सरपंच माई भोईर, उपसरपंच विजय घरत, न्हावेचे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, **(पान २ वर..)**

## अभिनंदन!



**पनवेल : तालुक्यातील वाजे ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी भाजपच्या मधुरा पाटील, तर उपसरपंचपदी गणेश पाटील यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, माजी सरपंच राजेश भोईर, राघो पाटील, राजेश भालेकर, मदन पाटील, पदू वाघ, ग्रामपंचायत सदस्य रेवण पाटील, शाम भालेकर, कमला कातकरी, काली कातकरी, रुपेश भोईर आदी उपस्थित होते.**

## नवी मुंबई, पनवेलमध्ये वीजपुरवठा खंडित

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईसह पनवेलमधील अनेक भागातील वीजपुरवठा बुधवारी (दि. १९) सायंकाळी खंडित झाला होता. तळेगाव ते खारखर या विजेच्या मार्गात बिघाड झाल्याने नवी मुंबईत वीजपुरवठा खंडित झाला. शहरात सध्या ७५० मेगावॅटचा तुटवडा जाणवतो आहे. त्यामुळे शहरात लोडशेडींग सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, नवी मुंबईतील बहुतांश भागातील वीजपुरवठा खंडित झाला आहे. सध्या एमएसईबी तांत्रिक बिघाड दूर करण्यासाठी प्रयत्न करत आहे. ७५० मेगव्हॅटचा तुटवडा असल्याने नवी मुंबईतील विजपुरवठा सलग दोन ते तीन तास खंडित होऊ नये यासाठी वेगवेगळ्या भागातील वीज ही अर्धा-तीन एक तास रोटेशन पद्धतीने खंडित केली जात आहे. सुमारे दोन ते तीन तासांनी वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला.



# इतरांमध्ये दहशत पसरवणारे आज दहशतीखाली

## योगी आदित्यनाथांचा माफियांना इशारा

**लखनऊ : वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशमधील कुप्रसिद्ध गुन्हेगार, राजकारणी अतिक अहमद आणि त्याचा भाऊ अशरफ अहमद यांना पोलीस बंदोबस्तातच तीन लोकांनी कॅमेऱ्यासमोरच ठार केले. यानंतर तीन दिवसांनी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी यासंबंधी आपली भूमिका व्यक्त केली आहे. ते म्हणाले, एके काळी इतरांवर दहशत गाजवणारे माफिया आज स्वतः दहशतीखाली आहेत. योगी आदित्यनाथ यांच्या उपस्थितीत लखनऊ आणि हरदोई जिल्ह्यात एक हजार एकरवर टेक्स्टाइल पार्क उभारण्यासंबंधी सामंजस्य करार करण्यात आला.

या कार्यक्रमात बोलत असताना त्यांनी सांगितले की, उत्तर प्रदेशची कायदा व सुव्यवस्था सुधारत असल्यामुळे आता



गुंतवणुकीसाठी कारखानदारांना आपले राज्य जवळचे वाटत आहे. या करारावर स्वाक्षरी करीत असताना केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयुष गोयलदेखील उपस्थित होते.

योगी आदित्यनाथ म्हणाले की, २०१७ आधी उत्तर प्रदेश दोन गोष्टीसाठी ओळखले जात होते. एक म्हणजे सर्वात वाईट कायदा आणि सुव्यवस्थेच्या राज्यासाठी आणि दुसरे म्हणजे दंगलीसाठी. काही जिल्ह्यांचे नाव ऐकले तरी लोकांना भीती वाटायची. आता कुणालाही कोणत्याही जिल्ह्याला घाबरण्याची गरज नाही. जे लोक एके काळी उत्तर प्रदेशच्या प्रतिमेसाठी धोका निर्माण करीत होते, आज त्यांनाच धोका निर्माण झाला आहे.

अतिक आणि अशरफ अहमद यांच्यावर पोलिसांसमोरच झालेला हल्ला आणि पोलिसांच्या चकमकीत अतिकचा मुलगा असदचा झालेला मृत्यू. यावरून विरोधकांनी सरकारविरोधात टीकेचा सूर लावला. या दोन्ही प्रकरणांची न्यायिक आणि विशेष चौकशी पथकाकडून चौकशी होणार असल्याचे योगी सरकारने जाहीर केले आहे. लखनऊ येथील कार्यक्रमात बोलत असताना आदित्यनाथ म्हणाले की, आज उत्तर प्रदेशमध्ये कोणताही माफिया दहशत पसरवू शकणार नाही. प्रत्येक जिल्हा आणि जिल्ह्याची ओळखही सुरक्षित आहे.

लखनऊ येथील कार्यक्रमात केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव रोहित कन्सल, केंद्रीय हातमाग आणि वस्त्रोद्योग खात्याचे अतिरिक्त मुख्य सचिव मोहन प्रसाद आणि उत्तर प्रदेश राज्य सरकारच्या एमएसएमई मंत्रालय यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. पीयुष गोयल यांच्यासह उत्तर प्रदेशचे एमएसएमई मंत्री राकेश सचन आणि केंद्रीय रेल्वे आणि वस्त्रोद्योग राज्यमंत्री दर्शना विक्रम जरदोश हे देखील उपस्थित होते.

पीएम मित्र योजनेसाठी (पीएम मेगा इंटेग्रेटेड टेक्स्टाइल) उत्तर प्रदेश राज्याला निवडल्याबाबत योगी आदित्यनाथ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले. या नव्या टेक्स्टाइल पार्कमुळे उत्तर प्रदेशची प्राचीन ओळख पुन्हा एकदा राज्याला लाभू शकेल. तसेच देशातला नवीन टेक्स्टाइल हब उत्तर प्रदेशमध्ये बनण्यासाठी हा करार काम करेल, असेही त्यांनी सांगितले. मागच्या सहा वर्षांत भाजपाकडून प्रयत्न केले जात असल्यामुळे राज्यात अनेक गुंतवणुकीचे प्रस्ताव येत आहे. आतापर्यंत ३५ लाख कोटींची गुंतवणूक आणण्यात यश आल्याचेही योगी आदित्यनाथ यांनी सांगितले.

### आता कोणताही माफिया उद्योगपतींना धमकवणार नाही!

*योगी आदित्यनाथ पुढे म्हणाले, मी तुम्हाला विश्वास देऊ इच्छितो की, दंगलीचे राज्य ही ओळख यूपी लवकरच पुसून काढेल. २०१२ ते २०१७ दरम्यान प्रत्येक तिसऱ्या दिवशी आधी इथे दंगली होत होत्या. या काळात तब्बल ७०० दंगलींची नोंद झाली. २००७ ते २०१३ दरम्यान ३६४ दंगलींची नोंद झाली. मात्र त्याच वेळी २०१७ ते २०२३ दरम्यान एकही दंगल उसळलेली नाही. एकदाही कर्फ्यू लावण्याची गरज पडली नाही. उद्योग आणि गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी ही अतिशय उत्तम परिस्थिती आहे. आता कोणताही माफिया किंवा व्यावसायिक गुन्हेगार उद्योगपतींना धमकवणार नाही.*

## आमदार साळवी यांची दुसऱ्या दिवशीही चौकशी



**अलिबाग : प्रतिनिधी**

शिवसेना ठाकरे गटाचे राजापूरचे आमदार राजन साळवी आणि कुटुंबियांची बुधवारी (दि. १९) एसीबी समोरील चौकशी पूर्ण झाली आहे. बुधवारी ५ तास चौकशी झाल्यानंतर साळवी कुटुंबिय एसीबी कार्यालयातून बाहेर पडले आणि रत्नागिरीच्या दिशेने रवाना झाले. दरम्यान आपण पूर्णपणे निर्दोष आहोत असा दावा आमदार राजन साळवी यांनी आज पुन्हा एकदा केला आहे.

साळवी पहिल्यांदा १४ डिसेंबर रोजी अलिबाग येथील एसीबी कार्यालयात चौकशीसाठी हजर राहिले होते. आज पाचव्यांदा अलिबाग येथील एसीबी कार्यालयात चौकशीसाठी आले होते. त्यांच्यासोबत त्यांचे कुटुंबीयदेखील चौकशीला सामोरे गेले. बुधवारी दिवसभर साधारण ५ तास त्यांची चौकशी करण्यात आली. आजची चौकशी शेवटची ठरावी. आजच्या चौकशीनंतर आपल्या मागचा चौकशीचा फेरा संपला असल्याचा दावा आ. साळवी यांनी केला आहे. अद्याप तरी पुढील चौकशीबाबत एसीबीने काही सांगितले नाही. यानंतरही त्यांनी चौकशीसाठी बोलावले तर उपस्थित राहून सहकार्य करू असे साळवी यांनी स्पष्ट केले.

# नागोठणेत संत गोरोबा काका पुण्यतिथी साजरी

**नागोठणे : बातमीदार**

शहरातील कुंभारआळी येथील श्री गणपती-हनुमान मंदिरात कुंभार समाजाचे आराध्य दैवत श्री संत शिरोमणी गोरोबा काका यांची पुण्यतिथी श्री संत अलिबागकर महाराज यांच्या आशीर्वादाने याहीवर्षी मंगळवारी (दि.१८) कुंभार समाज बांधवांकडून विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी काढण्यात आलेल्या दिंडीत लहान मुले विविध वेशभूषा साकारत सहभागी झाली होती. मंगळवारी उन्नती महिला मंडळ कुंभारआळी यांच्या पहाटेच्या काकड आरतीने संत गोरोबा काका पुण्यतिथी सोहळ्याची सुरुवात झाली. नंतर ग्रामस्थ मंडळ कुंभारआळी यांच्याकडून सकाळी ८ ते ९ वाजण्याच्या दरम्यान कळस स्थापना करण्यात आले. सकाळी ९ वा. पुण्यतिथी सोहळ्या निमित्ताने कुंभारआळी समाज बांधवांनी दिंडी सोहळा आयोजित केला होता. या दिंडी सोहळ्याची सुरुवात कुभारआळी येथील श्री गणपती-हनुमान मंदिरातून होऊन नंतर गांधी चौक मार्गे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिर परिसरातील श्री ज्ञानेश्वर मंदिरातून पुन्हा श्री क्षेत्र कुंभारआळी येथे आल्यानंतर या दिंडी सोहळ्याची सांगता करण्यात आली. यानंतर नागोठणे येथील संत सेवा मंडळाचे भजन झाले. दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास कडसुरे येथील विलास महाराज शिंदे यांच्या उपस्थितीत संत गोरोबा काका यांच्या मूर्तीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. याचबरोबर संत गोरोबा काका यांच्या पुण्यतिथीनिमित्त कुंभारआळी ग्रामस्थांच्या वतीने श्री सत्यनारायणाच्या महापूजा आयोजित करण्यात आली होती. यावेळी वरप (ता. पेण) येथील ह.भ.प. भास्कर महाराज कदम यांच्या नेतृत्वाखाली श्री दत्तकृपा हरिपाठ मंडळाचे हरिपाठ संपन्न झाला. तदनंतर रात्री ८ वा. ग्रामस्थ मंडळ कुंभारआळी यांच्या वतीने आलेल्या सर्व भाविकांना महाप्रसाद ठेवण्यात आला होता. यावेळी सर्व भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. शेवटी रात्री ९.३० वा. खेड (जि. रत्नागिरी) येथील किर्तनकार हे.भ.प. गणेश महाराज शिगवण यांचे सुश्राव्य किर्तन झाले.

दरम्यान रात्री नागोठणे येथील श्री क्षेत्र कुंभारआळी येथील श्री गणपती-हनुमान मंदिरात संत गोरोबा काका यांच्या पुण्यतिथीनिमित्त मनोभावे दर्शन घेतले. संत गोरोबा काका यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित विविध कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष विजय नागोठणेकर, उपाध्यक्ष मोहन नागोठणेकर, सचिव सुधिर वाडेकर, खजिनदार संजय कोल्हाटकर, सहखजिनदार मनोज गायकवाड, सहसचिव किशोर नागोठणेकर, सुर्यकांत गायकवाड यांच्यासह सर्व कुंभार समाज बांधवांनी मेहनत घेतली.



# परहूरपाडा येथील कार्यशाळेला प्रतिसाद




**रेवदंडा: प्रतिनिधी**

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक समता पर्व साजरा केला. त्यामध्ये मंगळवारी श्री समर्थ कृपा वृद्धाश्रम परहुरपाडा अलिबाग येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य तपासणी कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमाचे उद्‌घाटन रायगडचे सहाय्यक आयुक्त सुनील जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ॲड. गुंजाळ, संचालक समर्थ कृपा वृद्धाश्रम परहुर, सतपाल लोणे जनसेवा फाउंडेशन पुणे, डे केअर सेंटरविरंगुळाचे पदाधिकारी उपस्थित होते. पाहुण्यांचे व डॉक्टर टीमचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन ॲड. गुंजाळ यांनी केले.

कार्यक्रमास परिसरातील ५० ज्येष्ठ नागरिकांची मोफत रक्त तपासणी, बीपी शुगर, इतर तपासण्या करण्यात आल्या. जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर व त्यांची टीम आणि जनसेवा फाउंडेशन पुणेचे पदाधिकारी यांचेही पुष्पगुच्छ देऊन सहाय्यक आयुक्त सुनील जाधव यांनी सत्कार केला.

रायगड जिल्हा रुग्णालयातील डॉ. बामणे, डॉ. आशिष धरणकर, डॉ. सार्थक देशमुख, डॉ. राही पाटील, समाज कल्याण कार्यालयातील अधीक्षक माधुरी पाटील, गृहपाल संदीप कदम व मंदाकिनी पाटील, समाज कल्याण निरीक्षक या कार्यक्रमास उपस्थित होते.

# चौल भाटगल्ली येथे एकपात्री अभिनय स्पर्धा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल भाटगल्ली येथे मोरया कला अकादमीच्या वतीने जेष्ठ अभिनेत्री आशालता बावगावकर यांच्या स्मरणार्थ एकपात्री अभिनय स्पर्धा सोमवार १ मे रोजी सायकांळी चार वाजता घेण्यात येत आहे.

चौल भाटगल्ली येथे मोरया अकादमी, प्रकाश कवळे यांचे निवासस्थानी ही स्पर्धा संपन्न होणार असून ही स्पर्धा दोन गटात घेण्यात येणार आहेत. यामध्ये तिन ते पाच मिनिटासाठी वय वर्ष ५ ते १४ वर्षे मध्ये ४ ते ७ मिनिटासाठी गट क्रमाक १ व १५ वर्षापुढील गट क्रमांक दोन मध्ये स्पर्धा घेतली जाईल.

दोन्ही गटात ३ बक्षिसे व सन्मानचिन्ह तर मोठा गट प्रथम क्रमांक रूपये २ हजार, व्दितीय क्रमांक रूपये १ हजार ५०० व तृतीय क्रमांक रूपये १ हजार रोख व छोटा गटास सुध्दा प्रथम क्रमांक रूपये २ हजार, व्दितीय क्रमांक रूपये १ हजार ५०० व तृतीय क्रमांक रूपये १ हजार रोख रक्कमेचे पारितोषीक ठेवण्यात आली आहेत.

सहभागी होण्यासाठी दि. २८ एप्रिल २०२३ पर्यं प्रकाश कवळे भ्रमणध्वनी क्रमांक ९९६९००९७२१ व सुधाकर मेस्त्री भ्रमणध्वनी क्रमांक ९७०२५४५०१२ यांचेशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. प्रत्येक गटातील २० प्रवेशिकाना प्रथम प्राधान्य देण्यात येईल, असे कळविण्यात आले आहे.

# खालापूरमध्ये बालन्याय, बालविवाह बंदी जनजागृतीला उत्स्फूर्त प्रतिसाद

चौक, खालापूर : बालकल्याण समिती रायगड (प्रथमवर्ग दंडाधिकारी न्यायपिठ) व रायगड जिल्हा पोलीस दल यांचे संयुक्त विदयमाने बालन्याय अधिनियम व बालविवाह बंदी जनजागृती व प्रशिक्षण कार्यक्रमाची सुरूवात बुधवारी (दि. १९)सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक, अलिबाग-रायगड यांच्या उपस्थितीत खालापूर पोलीस ठाणेपासून करण्यात आली.

जनजागृती अभियानामध्ये जगन्नाथ साळुंखे, अध्यक्ष बालकल्याण समिती, रायगड, बालकल्याण समितीचे सदस्य ॲड. शुभांगी झेमसे, डॉ. गाणार, राम म्हसे यांनी बाल न्याय काळजी व संरक्षण अधिनियम



२०१५, बालविवाह प्रतिबंध कायदा, पोस्को कायदा २०१२, बाललैंगिक अत्याचार यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. त्याचबरोबर सोमनाथ घार्गे पोलीस अधीक्षक सो जि.रायगड यांनी पोलीस पाटील व महिला दक्षता समिती सदस्यांना मार्गदर्शन करून बालकल्याण समितीच्यां कार्याबददल आभार व्यक्त केले.

प्रशिक्षणाकरीता पोनि बाळा कुंभार, सपोनि युवराज सुर्यवंशी, मपोसई सरला काळे यांचेसह पोलीस ठाणेकडील स्टाफ, खालापूर पोलीस ठाणे हददीतील पोलीस पाटील, महिला दक्षता समितीचे सदस्य उपस्थित होते.

पान १ वरून

## आरओ प्लांटमुळे विद्यार्थ्यांना शुद्ध पाणी उपलब्ध

वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, मुख्याध्यापिका एस. ए. डोईफोडे, स्कूल कमिटी सदस्य विश्वनाथ कोळी, मुख्याध्यापिका प्रणिता गोळे, ज्येष्ठ नेते जयवंत देशमुख, ग्रामपंचायत सदस्य रोशन म्हात्रे, पी. आर. काजमी, माजी सरपंच सचिन घरत, मोरू नारायण विद्यालयाचे चेअरमन भार्गव ठाकूर, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सदस्य सुनीता घरत, स्कूल कमिटी सदस्य अनंता ठाकूर, लाईफ मेंबर जोत्स्ना ठाकूर, पनवेल पंचायत समिती सहाय्यक अभियंता स्नेहल धुपकर, ग्रामविकास अधिकारी विजयकुमार राठोड, अंकित घरत, व्ही. के. ठाकूर, पी. के. ठाकूर, किशोर पाटील, रामदास ठाकूर, फडतरे सर, मनीषा घरत, सुनीता घरत, वामन म्हात्रे , सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाचे चेअरमन शरद खारकर, सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाचे प्राचार्य मुक्ता खटावकर, लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापक स्वप्नाली म्हात्रे, शिक्षक-पालक संघाचे अध्यक्ष नामदेव ठाकूर, गोळे मॅडम यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक उपस्थित होते.

# मुरुड डेपो बंद होण्याच्या मार्गावर; असंख्य गाड्या अलिबाग डेपोला वर्ग

**मुरुड : प्रतिनिधी**

रेवदंडा पुलांच्या दुरुस्तीमुळे अलिबाग मुंबई,पुणा,ठाणे,व इतर गाड्याचा मार्ग बदलल्याने प्रवाशांना यांच्या आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याने काही प्रवाशांनी एसटी प्रवास टाळत असल्याने याचा आर्थिक फटका एसटी डेपो बसला दिवसांनदिवस उत्पन्नात घट होऊ लागली.यामुळे असंख्य गाड्या अलिबाग डेपोला वळविण्यात आल्या आहेत यामुळे मुरुड डेपो बंद होण्याच्या मार्गावर पहिले पाऊल पडले आहे.असे म्हणावे अवगत ठरणार नाही.

मुरुड जंजिरा पर्यटन स्थळ असल्याने देश -विदेशातुन पर्यटक एसटी ने ये-जा करित असतात.मुरुडला येण्यासाठी एसटी बस ही महत्त्वाची भुमीका बजावते २००७ साली मुरुड आगार व्यवस्थापक -पंकज ढावरे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकाविला होता यामुळे सर्वंचस्थांरावर मुरुड डेपो चे कौतुक करण्यात आले होते.पण आज हा डेपो बंद होण्याच्या मार्गावर जात असल्याने पर्यटकांसह नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

मुरुड आगाराकरिता साध्या गाड्या ३५ तर निम आराम १३होत्या व चालक- वाहक असा एकुण१३३चा स्टॉफ होता. परंतु पुलांच्या दुरुस्तीमुळे मुरुड आगारातुन साध्या २३गाड्या,निम आराम १२ गाड्या अलिबाग डेपोला वळविण्यात आल्या. त्याबरोबर ५३ चालक-वाहक ही देण्यात आले. सध्या मुरुड आगारात साध्या गाड्या २२ तर निम आराम १ आसुन चालक-वाहक ८०चा स्टाफ शिल्लक आहे.गाड्या कमीमुळे फे-या कमी होऊ लागल्या यामुळे प्रवासी प्रायव्हेट गाडी मधुन प्रवास करित असल्याने एसटी बसेस ला आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे.यामुळे अव्वल ठरलेल्या एसटी डेपो मागे जात आहे.

मुरुड आगार व्यवस्थापक -निता जगताप यांच्याशी या संदर्भात विचारणा केली असता ते म्हणाले की रेवदंडा पुलांच्या दुरुस्तीमुळे आपण आपल्या डेपोच्या गाड्यासह चालक-वाहक ही देण्यात आले आहे.पुलांच काम पूर्ण झाल्यानंतर ज्या गाड्या आपल्या कडुन दिल्या गेल्यात ते पुन्हा आपल्या मिळणार आहेत. सध्या आपल्या डेपो मधुन मुंबई साळाव मार्ग ६ तर भालगांव मार्ग २ आहेत.,बोरिवली भालगांव मार्ग १, कल्याण साळाव मार्ग १,भांडुप साळाव मार्ग १,स्वारगेट साळाव पाली मार्ग १, शिर्डी साळाव मार्ग १,रोहा भालगांव मार्ग ३ तर सुपेगाव१,महाड सुपेगाव मार्ग १तर साळाव मार्ग १ ,मुरुड साळाव रोजच्या ५ फे-या चालू केल्या आहेत.अशी माहिती यावेळी निता जगताप यांनी दिली.

याबाबत स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांनी पुलाचे काम लवकरात लवकर व्हावे यासाठी प्रयत्न करावे अशी स्थानिक नागरिक मागणी करीत आहेत.

# पोटाची खळगी भरण्यासाठी कष्टकरी चिंतातूर

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

एखाद्या गावात विकासात्मक आणि सर्वासाठी उपयुक्त असणाऱ्या सेवासुविधाची, नाविन्यपूर्ण प्रकल्पाची काही स्वार्थी लोकांकडून प्रतारणा केली जाते त्यावेळेस ते गाव अन्य ठिकाणांच्या तुलनेत खूपच मागे जात असते. त्याचा विपरीत परिणाम लहानसहान कष्टकरी जनतेला सोसावा लागतो.

भविष्यात कधीही न येणारी ई रिक्षा सारखी सुविधा उपलब्ध झालेली असताना केवळ पिढ्यानपिढ्या आपल्या जुन्याच व्यवसायाच्या चक्रव्यूहात गुरफटलेल्या काही संकुचित वृत्तीच्या व्यवसायिकांमुळे या गावाला विकासात्मक दिशा आजवरच्या काळात मिळालेली नाही. त्यातच काही राजकीय पक्षांच्या नेत्यांचा विकासाला प्राधान्य देण्याऐवजी चिमूटभर मते आपल्या पारड्यात पाडून घेण्यासाठी खटाटोप सुरू असतो त्यामुळे ज्यांना भावी पिढीच्या उद्धाराबाबत चिंता नाही अशांना काही राजकीय पक्ष आधार देत आहेत. केवळ तीन महिन्यात ई रिक्षाने दिलेल्या अल्प सेवेत



**ई रिक्षा सुरु होण्याची मागणी**

या गावाचे रुपडे बदलून टाकले होते. एवढेच नव्हे तर मोठया प्रमाणावर इथल्या पर्यटनाला चालना मिळवून दिली होती. ऐन मंदीच्या काळात सुध्दा इथे स्वस्तात आणि सुरक्षित प्रवासाची हमी ई रिक्षाच्या माध्यमातून मिळत असल्याने तीन महिन्यात आबालवृद्ध पर्यटकांनी सुद्धा मोठया प्रमाणात गर्दी केली होती यामुळे सर्वसामान्य लोकांच्या व्यवसायाला गती प्राप्त झाली होती. कष्टकरी जनता आपली उपजीविका उत्तम प्रकारे करत होती परंतु विकासाच्या बाबतीत ह्या शापित गावाला संकुचित वृत्तीच्या लोकांमुळे उन्नती साधता येत नाही अथवा भावी पिढीला प्रगतीच्या प्रवाहात नेता येत नाही. सध्यातरी माथेरान सारख्या ठिकाणी उन्हाचा जवळपास ३२ ते ३४ अंशाचा पारा चढलेला असताना आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी आदिवासी बांधव कडक उन्हात बसून वस्तूंची विक्री होण्यासाठी पर्यटकांची बाजारपेठेमध्ये प्रतीक्षा करत आहेत.त्यातच नव्याने लावलेल्या उत्तम दर्जाच्या मातीच्या क्ले पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांमुळे उष्णता जाणवत नाही.परंतु ई रिक्षाची सेवा नुकताच मार्च महिन्यात बंद करण्यात आल्यामुळे सर्व व्यावसायिक त्याचप्रमाणे ज्यांचे हातावर पोट आहे असे कष्टकरी चिंतातुर दिसत आहेत. एखाद्या चातकासारखी ते पर्यटकांची वाट पहात आहेत. त्यासाठी लवकरच ई-रिक्षा सुरू होऊन पॉईंट्स वरील लहान लहान स्टॉल धारकांना सुध्दा व्यवसाय प्राप्त व्हावा यासाठी लवकरात लवकर इथे ई-रिक्षा सुरू व्हावी अशी मागणी श्रमिकांच्या वतीने जोर धरू लागली आहे.

> **काही वर्षांपासून आमच्या पॉईंटकडे पर्यटकांना आणले जात नाही त्यांना अगदी जवळ असणारे तसेच मनाला वाटेल ते पॉईंट्स दाखवले जातात. त्यामुळे बहुतेक पॉईंट्सवरील स्टॉल धारकांवर उपासमारीची वेळ आली आहे. तीन महिने ई रिक्षा सुरू होती. त्यावेळेस मोठया प्रमाणावर पर्यटक पॉईंट्सला भेटी देत होते परंतु या रिक्षा बंद केल्यामुळे आमच्या दुकानातील माल पडून असून खराब होत आहे. त्यासाठी शासनाने लवकरच ई रिक्षा सुरू करून आमचा व्यवसाय वृद्धिंगत होण्यासाठी प्रयत्न करावेत.**
>
> **-दिलीप कदम, स्टॉल्स धारक, बेलव्हिडियर पॉईंट, माथेरान**

# वाढत्या तापमानामुळे काळजी घ्या

## पनवेल महापालिकेकडून नागरिकांना आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमध्ये कमाल तापमान चाळिशीपार गेले असून कडाक्याच्या उन्हामुळे पनवेलकरांना उन्हाचे दाह जाणवू लागला आहे. अचानक उन्हाचा तडाखा वाढल्याने परिसरात अंगाची लाहीलाही करणारे ऊन आणि प्रचंड उकाडा निर्माण झाला आहे. निरभ्र आकाश आणि देशाच्या वायव्येकडून येणाऱ्या उष्ण वाऱ्यांमुळे ऊन चांगलेच तळपू लागले आहे. चटके देणारे ऊन आणि घामाच्या धारा अन दिवसभर उकाडा, असा अनुभव सध्या पनवेलकर घेताना दिसून येत आहेत.

अनेक भागात उष्माघातामुळे नागरिकांचा जीव गेल्याचे समोर येत आहे. त्यामुळे उष्माघात म्हणजे नेमके काय याबाबत नागरिकांना चांगलेच कळून चुकले आहे. या अनुषंगाने उष्माघातापासून बचाव करण्यासाठी डॉक्टरांकडून विविध उपाय सांगितले जात आहेत.

मागील आठ-दहा दिवसांपासून पनवेल परिसराच्या तापमानात वाढ होत होती. तापमान आणखी वाढण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली होती. त्यानुसार कमाल तापमानाने पनवेल परिसर आणि नवी मुंबईत एकदम उसळी घेतली. कडक उन्हामुळे उष्णतेच्या लाटेची शक्यता वर्तविण्यात आलेली आहे. उष्णतेच्या लाटेच्या कालावधीत उष्माघातापासून नागरीकांचा बचाव करण्यासाठी काय करावे व काय करू नये याबाबतची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

उष्माघातामुळे शारीरीक ताण पडून मृत्यु होण्याची शक्यता असल्याने उष्माघातामुळे होणारे गंभीर परिणाम टाळण्यासाठी विविध उपाययोजना डॉक्टरांकडून सांगण्यात येत आहेत. तहान लागलेली नसली तरीसुध्दा जास्तीत जास्त पाणी पिण्यात यावे. हलकी,पातळ व सच्छिद्र, सुती कपडे वापरावेत. बाहेर जातांना गॉगल्स, छत्री/टोपी, बूट व चप्पलांचा वापर करण्यात यावा. प्रवासात पाण्याची बॉटल सोबत ठेवावी. उन्हात काम करीत असलेल्या व्यक्तींनी डोक्यावर टोपी किवा छत्रीचा वापर करण्यात यावा. लिंबू पाणी, ताक इत्यादीचा नियमित वापर करण्यात यावा. अशाप्रकारच्या विविध सूचना डॉक्टर, हवामानतज्ञ तसेच जाणकारांकडून देण्यात येत आहेत.

अचानक तापमानात वाढ झाल्याने उष्माघाताचे प्रमाण वाढले आहे. उष्णतेच्या लाटेमुळे होणारे गंभीर दुष्पपरिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी दुपारच्या वेळी अनावश्यक घराबाहेर पडू नये. आपली आणि आपल्या कुटुंबियांची काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागातर्फे करण्यात आले आहे. बाहेरचे तापमान प्रमाणाबाहेर वाढले की, शरीरातील तापमान नियंत्रित करण्याची यंत्रणा कोलमडते. उष्माघात झाल्यावर चक्कर येणे, मळमळ, उलट्या होणे, डोकेदुखी, दरदरून घाम फुटणे, थकवा येणे स्नायूंना आकडी येणे अशी लक्षणे दिसू लागताच जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क करावा, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.




### थंड पेयांना मागणी वाढली

**गेल्या आठवडाभरापासून पनवेल शहर आणि परिसरातील तापमान कमालीचे वाढल्याने सारेच हैराण झाल्याचे प्रकर्षाने जाणवत आहे. त्यामुळे ऐन उन्हाळ्यात शरीराला गारवा मिळावा म्हणून आता थंड पेयांना मागणी वाढली आहे. आरोग्यपूरक फळांनाही आता चांगला भाव आलेला आहे. ठिकठिकाणी गल्लोगल्लीत बर्फाचे गोळे विक्रेते फिरताना दिसत आहेत. बाजारात लिंबांनाही चांगला भाव आलेला आहे. याशिवाय थंडगार सब्जाही विकला जात आहे. बाजारात द्राक्षे, कलिंगडांनाही ग्राहकांची पसंती मिळत आहे. रसवंतीगृहातही गर्दी होत आहे.**

**सतत उन्हात गेल्याने मेंदूवर परिणाम होतो व मूर्च्छा येऊन पडण्याचे प्रकार घडतात. उन्हातून आल्यानंतर किमान १० मिनिटे शांत बसून त्यानंतरच पाणी प्यावे, परंतु अतिशय थंड पाणीही पिऊ नये. दिवसात भरपूर पाणी प्यावे. उन्हात घाम भरपूर येत असल्याने शरीरातील काही भागात घाम साचून त्वचेचे रोग होण्याची शक्यता असते यासाठी स्वच्छता बाळगावी व दिवसातून दोन वेळा अंघोळ करावी. शक्यतो तेलकट, तुपकट व नॉनव्हेज पदार्थ खाणे शक्यतो टाळावे. अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावित व चक्कर येत असल्यास तत्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा.**

**– डॉ. इंदर चव्हाण, पनवेल**




# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली 'सीकेटी'त परिसंवाद




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगु काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (स्वायत्त) येथे मंगळवारी (दि. १८) दुपारी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व एम.के.सी.एल शाहू इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी प्रा. लि. यांच्या समन्वयाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०: संभावना आणि आव्हाने या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भुषविले. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून एम. के. सी. एल. चे मुख्य मार्गदर्शक आणि माजी व्यवस्थापकीय संचालक विवेक सावंत लाभले होते व कार्यक्रमासाठी सन्माननीय अतिथी म्हणून संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे आणि शाहू संस्थेच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचे व्यवस्थापकीय संचालक जयंत भगत हे उपस्थित होते.

या वेळी प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील आणि आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स विद्याशाखांचे प्रमुख आणि विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये रायगड जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता.

संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी महाविद्यालयाच्या कीर्तीचा मागोवा घेत, महाविद्यालयाद्वारे संचालित विविध अभ्यासक्रमांचा आढावा घेतला व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणीच्या दृष्टीने महाविद्यालयाने सुरू केलेल्या सुविधांची माहिती दिली. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, कला शाखेचे प्रमुख डॉ. बी. एस. पाटील, वाणिज्यशाखेचे प्रमुख प्रो. डॉ. एस. बी. यादव, विज्ञानशाखेच्या प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर त्याच बरोबर आयोजन समितीचे सदस्य यांनी विशेष परिश्रम घेतले.

प्रस्तुत परिसंवाद यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर तसेच पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.




### विविध विषयांवर उपस्थितांना मार्गदर्शन

***मा. श्री. विवेक सावंत यांनी महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची व्यावहारिक अंमलबजावणी या विषयावर सर्व उपस्थितांना विशेष मार्गदर्शन केले. त्याचबरोबर त्यांनी शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये डिजिटलायझेशन, ऑटोमेशन, आभासीकरण, एकत्रीकरण, सामाजिक मध्यस्थी इत्यादी विषयांना प्राधान्य द्यावे असे विचार त्यांनी मांडले.***

## निवडक

### नवीन पनवेलमध्ये तरुणाला श्वानदंश

**पनवेल :** नवीन पनवेल येथील सेक्टर १२ मध्ये एका २५ वर्षीय तरुणाला कुत्रा चावल्याने खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पनवेल येथील बावन बंगला येथे २५ वर्षीय तरुण मोटर ट्रेनिंग स्कूल चालवतो. नवीन पनवेल येथील सेक्टर १२ मधील गार्डनमधील जॉगिंग ट्रॅकमधून वॉकिंग करत असताना एका महिलेसोबत असलेल्या पाळीव कुत्र्याने या तरुणावर हल्ला केला होता. या वेळी तरुणाच्या हाताला कुत्र्याने चावा घेतल्याने दुखापत झाली होती.



**पनवेल : शहरातील कुंभारवाडा येथील संत श्री गोरा कुंभार प्रतिष्ठान सामाजिक संस्थेच्या वतीने श्री संत शिरोमणी गोरोबा काका यांच्या ७०६ वर्ष समाधी सोहळा (पुण्यतिथी) आयोजित करण्यात आला होता. या वेळी स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी भेट देत संत श्री गोरा कुंभार यांचे दर्शन घेतले. या वेळी पंचकमिटीतर्फे त्यांचे स्वागत करण्यात आले.**

# उरणमध्ये हेमाक्षी एंटरप्राइजेसचे उद्घाटन

**उरण : वार्ताहर**

भाजप उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड यांच्या हेमाक्षी एंटरप्राइजेसच्या उद्घाटनावेळी वास्तुशांती व सत्यनारायनाची पूजेचे आयोजन करण्यात आले होते. हेमाक्षी एंटरप्राइजेसबद्दल आमदार महेश बालदी यांनी गावंड यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या वेळी भाजप तालुकाध्यक्ष रवी भोईर, उरणच्या माजी नगराध्यक्षा सायली म्हात्रे, खोपटे गावातील उद्योगपती मिलिंद ठाकूर, भाजप उरण महिला तालुका अध्यक्ष राणी म्हात्रे, जेआर लॉजिक्टिक्सचे मालक जितेंद्र कटारमल, दहागाव माजी विद्यार्थी अध्यक्ष कृष्णा पाटील, कोप्रोली गावातील थेट सरपंच अलका म्हात्रे व ध्रुवा शेठ, अभ्युदय बँकचे मैनेजर पारटे, पिरकोन गावातील सरपंच कलावती पाटील, सारडे गावातील थेट सरपंच रोशन पाटील, शशिकांत पाटील उरण पूर्वविभाग अध्यक्ष, खोपटे गावातील उद्योगपती देवेंद्र पाटील, आवरे गावातील युवा नेते धनेश गावंड आदींनी उपस्थिती दाखवली. गावंड कुटुंबीयांकडून या सर्वांचे स्वागत करण्यात आले.



# साधना डोईफोडे आदर्श मुख्याध्यापक; लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे गौरवोद्गार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एका आदर्श मुख्याध्यापक कसा असावा अश्या प्रकारचे उत्तम काम साधना डोईफोडे यांनी केले असल्याचे गौरवोद्गार रयतचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या गव्हाण येथे सेवापूर्ती समारंभावेळी केले.

३५ वर्षेसेवा करून रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी विद्यालय व जनार्दन भगत आत्माराम भगत कॉलेजच्या मुख्याध्यापीका साधना अजित डोईफोडे (खटावकर) या सेवानिवृत्त झाल्या आहे. त्यानिमीत्त विद्यालयात बुधवारी सेवापूर्ती सत्कार समारंभ रयते मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि आबासाहेब देशमुख यांच्या उपस्थितीत झाला. या वेळी डोईफोडे दांपत्याचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



या वेळी रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य आबासाहेब देशमुख, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सरपंच माई भोईर, उपसरपंच विजय घरत, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच हरिशचंद्र म्हात्रे, वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, मुख्याध्यापिका एस. ए. डोईफोडे, स्कुल कमिटी सदस्य विश्वनाथ कोळी, मुख्याध्यापिका प्रणिता गोळे, जेष्ठ नेते जयवंत देशमुख, ग्रामपंचायत सदस्य रोशन म्हात्रे, पी. आर. काजमी, माजी सरपंच सचिन घरत, मोरू नारायण विद्यालयाचे चेअरमन भार्गव ठाकूर, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सदस्य सुनीता घरत, स्कूल कमिटी सदस्य अनंता ठाकूर, लाईफ मेंबर जोत्स्ना ठाकूर, अंकित घरत, व्ही. के. ठाकूर, पी. के. ठाकूर, किशोर पाटील, रामदास ठाकूर, फडतरे सर, मनीषा घरत, सुनीता घरत, वामन म्हात्रे, सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालय मराठी माध्यमचे चेअरमन शरद खारकर, सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाचे प्राचार्या मुक्ता खटावकर, लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश स्कुलच्या मुख्याध्यापीका स्वप्नाली म्हात्रे, शिक्षक पालक संघाचे अध्यक्ष नामदेव ठाकूर, गोळे मॅडम, उपमुख्याध्यापक पी. बी. मंडले, लाईफ मेंबर आर. एस. भोईर, पर्यवेक्षिका व्ही. बी. मोहिते, ज्युनियर कॉलेज विभाग प्रमुख बी. पी. पाटोळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक आणि मान्यवर उपस्थित होते.

या वेळी साधना डोईफोडे यांनी आपल्या सेवाकार्यातील आठवणींना उजाळा देत ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्यांचे आभार मानले. तसेच पारगाव शाखेतील इमारतीसाठी १० हजार रुपयांचा धनादेश सुपूर्द केला.

# रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये पाच दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात २४ ते २८ एप्रिल यादरम्यान पाच दिवसीय राष्ट्रीय पातळीवर बहुविद्याशाखीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम घेतला जाणार आहे.

या पाच दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमचे आयोजन महाविद्यालयातील वर्कशॉप व सेमिनार समिती व अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने केले आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. पराग आजगांवकर (प्राचार्य, नरसीमोंजी कॉमर्स ॲण्ड इकॉनॉमिक्स मुंबई) तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ. सिद्धेश्वर गडदे (सचिव, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था पनवेल) हे उपस्थित राहणार आहेत. या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅममध्ये वेगवेगळ्या सत्रांचे आयोजन केले आहे.

२४ एप्रिलला प्रबंध लेखन व प्लेगॅरीझमवरती सकाळी १०.३० वाजता एका सत्राचे आयोजन केले आहे. या सत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. शिवाजी सरगर (प्रोफेसर अँड हेड, डिपार्टमेंट ऑफ इंग्लिश युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई) मार्गदर्शन करणार आहेत. त्याच दिवशी दुपारी २ ते ५ या वेळेत संशोधन पद्धती या विषयावरती द्वितीय सत्राचे आयोजन केले आहे. या सत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. श्रद्धा भूमे (उपप्राचार्य, ज्ञानसाधना कॉलेज ठाणे) मार्गदर्शन करणार आहेत.

२५ एप्रिलला सकाळी १० ते १ या वेळेत रिव्ह्यू ऑफ लिटरेचर व रिसर्च प्रपोजल या विषयावरती प्रथम सत्राचे आयोजन केले आहे. या सत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. श्रद्धा भूमे (उपप्राचार्य, ज्ञानसाधना कॉलेज ठाणे) या मार्गदर्शन करणार आहेत. याच दिवशी दुपारी १.३० ते ४.३० या वेळेत रिसर्च पेपर कसा लिहायचा व तो कसा प्रसिद्ध करायचा या विषयावरती द्वितीय सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या सत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. एम गुरुस्वामी मार्गदर्शन करणार आहेत.

२६ एप्रिलला सकाळी १० ते १ या वेळेत पोस्ट डॉक्टरेल रिसर्च व मेजर व मायनर रिसर्च प्रोजेक्ट या विषयावरती प्रथम सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या सत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. बळीराम गायकवाड (प्राचार्य, कोकण ज्ञानपीठ आर्ट्स आणि कॉमर्स कॉलेज उरण) व डॉ. प्रवीण वाळके (सहाय्यक प्राध्यापक, ज्ञानो सायन्स व टेक्नॉलॉजी कलिना, मुंबई विद्यापीठ) मार्गदर्शन करणार आहेत.

२७ एप्रिलला सकाळी १० ते १ यावेळेत टीचिंग लर्निंग अस्पेक्ट्स या विषयावरती प्रथम सत्राचे आयोजन केले आहे. या सत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. गिरीश गुंड (असोसिएट प्रोफेसर, महात्मा फुले आर्ट्स कॉमर्स व सायन्स कॉलेज पनवेल) मार्गदर्शन करणार आहेत. त्याच दिवशी दुपारी एक ते दीड या वेळेत करिक्युलर को करिक्युलर ॲण्ड एक्स्ट्रा करू ॲक्टिव्हिटीज या विषयावरती द्वितीय सत्राचे आयोजन केले आले आहे. या सत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. उत्तम जाधव (असोसिएट प्रोफेसर, गोडावत युनिव्हर्सिटी कोल्हापूर) मार्गदर्शन करणार आहेत.

२८ एप्रिलला सकाळी १० ते १२ या वेळेत सहभागी झालेल्या सर्व प्राध्यापकांना सर्टिफिकेट दिली जाणार आहेत व समारोपाचा कार्यक्रम होणार आहे. प्रस्तुत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड, प्रा. महेश्वरी झिरपे (समन्वय गुणवत्ता सिद्धता कक्ष) तसेच प्रा. डॉ. फारुख शेख (समन्वयक कार्यशाळा व चर्चासत्र समिती) या सर्वांनी मुंबई विद्यापीठाला सलग्नित असणाऱ्या सर्व महाविद्यालयातिल व स्वायत्त्य महाविद्यालयातील प्राध्यापकांना या पाच दिवसीय बहुविद्याशाखीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमसाठी नोंदणी करावी व यासर्व सत्रांचा लाभ घ्यावा, अशी विनंती केली आहे.

# आगामी सणांनिमित्त पोलिसांकडून मार्गदर्शन

**पनवेल : वार्ताहर**

आगामी येणारे सण पनवेल शहरात शांतता व सलोखा राखत मोठ्या उत्साहाने साजरी करा अशी सूचना व पनवेल शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक दिलीप शिंदे यांनी केले. अक्षय तृतीया आणि रमजान ईदनिमित्त पनवेल शहर पोलीस ठाण्यात मोहल्ला कमिटी, मज्जिद ट्रस्टी व मौलवी यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रभारी पोलीस निरीक्षक दिलीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.



या वेळी पोलीस निरीक्षक दिलीप शिंदे यांच्यासह गोपनीय व पासपोर्ट विभागाचे सहाय्यक फौजदार संजय धारेराव, पोलीस हवालदार गौतम भोईर, पोलीस नाईक भाऊसाहेब लोंढे, पोलीस नाईक किरण सोनावणे, स्थानिक माजी नगरसेवक मुकीद काझी यांच्यासह मोहल्ला कमिटी, मज्जिद ट्रस्टी व मौलवी उपस्थित होते.

या वेळी दिलीप शिंदे यांनी मार्गदर्शन करताना आक्षेपार्ह पोस्टर्स अथवा बॅनर लावू नये, धार्मिक तेढ निर्माण होईल असे भाषण करू नये, मशिद जवळ वाहन पार्क करू नये, अफवांवर विश्वास ठेवू नये, सोशल मीडियावर काही आक्षेपार्ह विधानबाबत माहीती मिळाल्यास पोलिसांना माहिती द्यावी, न्यायालयीन आदेशानुसार स्पीकरचा वापर करावा, आक्षेपार्ह वस्तू, वाहने, इसम, इत्यादी आढळून आल्यास पोलीस ठाण्याची संपर्क साधावा अश्या सूचना दिल्या. तसेच रमजान ईदनिमित्त मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या.

## संपादकीय

# वसंतकाले संप्राप्ते

ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांचे आणि अजितदादा पवार यांचे राजकीयदृष्ट्या कधीही फारसे पटले नाही हे एकंदरीत दिसते. राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्याशी विशेष जवळीक असणाऱ्या संजय राऊत यांनी अजितदादांबद्दल मात्र उलटसुलट विधाने करणे सोडलेले नाही. त्याचा स्फोट मंगळवारी अजितदादा पवार यांच्या एका पत्रकार परिषदेत झाला. तुम्ही तुमच्या पक्षाचे प्रवक्तेपद सांभाळा, आमची वकिली करण्याचे काही कारण नाही अशा शब्दांत त्यांनी संजय राऊत यांना सुनावले.

**'... वसंतकाले संप्राप्ते काक काक: पिक पिक:' हे संस्कृत सुभाषित वापरून ठाकरे गटाचे वकील देवदत्त कामत यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठासमोरील आपला युक्तिवाद संपवला होता. वसंत ऋतु आला की कावळा कोण आणि कोकीळ कोण हे कळून येते, अशा अर्थाचे हे सुभाषित आहे. घटनापीठाचा निकाल कुठल्याही क्षणी लागू शकतो ही परिस्थिती ध्यानात आल्याने महाराष्ट्रातील राजकारणात अनेक कावळ्यांची कावकाव सध्या सुरू आहे. घटनापीठाचा निकाल शिंदे गटाच्या विरोधात गेल्यास विद्यमान सरकार पडेल आणि भाजपसोबत साथसंगत करून राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजित पवार हे राज्याच्या कारभाराचा डोलारा सांभाळतील या एका तकलादू अंदाजावर सध्या महाराष्ट्राचे राजकारण पेटले आहे. वास्तविक या प्रकारच्या वावड्यांना काहीही अर्थ नाही अशा शब्दांत खुद्द अजितदादा पवार यांनी पत्रकारांना फटकारल्यानंतरही ही चर्चा थांबलेली नाही. राष्ट्रवादी काँग्रेस लवकरच फुटणार असून या फुटीमागे अजितदादा पवार यांचे राजकारण आहे अशा प्रकारच्या अफवा मुद्दाम कुणीतरी हवेत सोडून दिल्या आहेत हे उघड आहे. त्यांना उत्तरे देता देता खुद्द अजितदादा पवार यांची पुरती दमछाक झाली हेही खरेच आहे. जीवात जीव असेपर्यंत मी पक्षाचेच काम करत राहणार असा स्पष्ट निर्वाळा देऊन अजितदादांनी या वादळाला पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला होता, तो फारसा यशस्वी झाला असे मात्र म्हणता येणार नाही. तथापि या सगळ्याला कारणीभूत त्यांच्याच महाविकास आघाडीतील काही तोंडाळ नेते आहेत हे त्यांनी विसरू नये. अजितदादा पवार हे महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे नेते आहेत. किंबहुना, त्यांना वगळून महाराष्ट्राचे राजकारण पुढे नेता येणार नाही. स्पष्टवक्तेपणा आणि निर्णयक्षमतेसाठी ते प्रसिद्ध आहेत. केवळ विरोधासाठी विरोध करण्याचे राजकारण त्यांनी कधीही केले नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा करिश्मा आणि ईव्हीएमबद्दलची त्यांची अनुकूल मते यामुळे त्यांच्याच पक्षातील काही नेते तोंडघशी पडलेत. राष्ट्रवादी काँग्रेसची वकिली करू पाहणारे काही विश्वप्रवक्ते विनाकारण अजितदादा पवार यांच्यावर अप्रत्यक्षपणे ठपका ठेवण्याचा उद्योग करत होते. त्यांनाही अजितदादांनी चांगलेच खडे बोल सुनावले आहेत. गेली अडीच-तीन वर्षे अजितदादांच्या प्रतिमेला तडे जातील अशा प्रकारची वक्तव्ये महाविकास आघाडीच्या नेत्यांनीच वेळोवेळी केली. एकीकडे एकजुटीची वज्रमूठ दाखवत महाराष्ट्रभर सभा घेत हिंडायचे आणि दुसरीकडे एकमेकांचीच उणीदुणी काढायची असा प्रकार महाविकास आघाडीत सध्या सुरू आहे. सत्तेसाठी एकत्र आलेल्या या तिन्ही पक्षांना विरोधात असताना एकजूट दाखवणे कठीण जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पाडण्यासाठी ऑपरेशन लोटस सुरू असल्याची हवा निर्माण केली जात आहे. परंतु महाविकास आघाडीची तथाकथित एकजूट फोडण्यासाठी कुठल्याही ऑपरेशनची गरज नाही यातच सारे काही आले.**

# पोलादपूरात अधिकाऱ्यांमुळे अनेक समस्या प्रलंबित

### शासनाने त्वरीत बदल्या जाहीर कराव्यात; नागरिकांची मागणी

पोलादपूर तालुक्यातील काही प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बेजबाबदार वागण्यामुळे तालुक्यातील बऱ्यास समस्या मार्गी लागत नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे येथील नागरिकांकडून या अधिकाऱ्यांच्या तत्काळ बदल्या कराव्यात, अशी मागणी शासनाकडे करण्यात आली आहे. पोलादपूर तालुक्यातील शिक्षण अधिकारी, ग्रामीण रुग्णालयातील अधिकारी, वनविभाग, पोलीस, महसूल विभाग, नगरपंचायत कर्मचारी येथील सर्व प्रशासकीय अधिकारी त्यांना दिलेले कामही योग्य पद्धतीने पूर्ण करीत नसल्याचा तालुक्यातील नागरिकांचा आरोप आहे.

**खबरबात**
**शैलेश पालकर**

पोलादपूर तालुक्यातील अनेक प्रश्न लालफितीमध्ये अडकले असून अनेक प्रश्नांपासून प्रशासनामधील अधिकाऱ्यांनी जनतेची फसवणूक केली असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे जवळजवळ सर्वच विभागांतील तालुक्याच्या सर्वांगिण ऱ्हासास कारणीभूत ठरत असल्याने तातडीने बदल्या करण्यासह पोलादपूर तालुक्यातील नोकरी कशी करावी अथवा कशी करू नये, याबाबतचे प्रशिक्षण घेऊनच नेमणुका होण्याची गरज आहे.

पोलादपूर तालुक्यात शिक्षण विभागामध्ये तालुक्याच्या ठिकाणी वास्तव्य करणाऱ्या गुरूजींचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असून सर्वांनीच स्वत:च्या घरे अथवा सदनिका घेतल्या असताना तसे शिक्षण खात्यास अवगत न केल्याने सर्वचजण घरभाडेभत्ता घेत असल्याचे दिसून येत आहे. नोकरीच्या ठिकाणी वास्तव्याची अट केव्हाच पायाखाली तुडविली गेली आहे. दांड्या मारणाऱ्या शिक्षकांना गटशिक्षणाधिकारी महोदय काहीही करू शकत नाहीत तर माध्यमिक शिक्षण विभागावर कोणाचेही नियंत्रण नसल्याने चतुर्थ श्रेणी कर्मचारी तसेच बोगस पदवीधारक शिक्षक राजरोसपणे उपजिविका चालवित आहेत. ज्या खासगी विनाअनुदानित शाळा इंग्लिश मिडीयम नावाखाली सुरू आहेत. त्यांच्या शिक्षकांची योग्य शैक्षणिक अर्हता नसल्याचे दिसून येत आहे. स्वखर्चाने चालविल्या जाणाऱ्या शाळांमधून संस्थाचालकांचा ऐशोआराम सुरू असल्याचे दिसून येत आहे. शहरातील अनुदानित शाळेने यामुळेच विनाअनुदानित इंग्लिश मिडीयम वर्ग सुरू करून विद्यार्थ्यांकडून फी आकारणी करीत बक्कळ नफा कमविण्याचे धोरण अवलंबिले असल्याचे दिसून येत आहे.

पळचिल प्राथमिक आरोग्य केंद्र कशेडी घाटामध्ये मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील सर्वात जवळचे ठिकाण असून याठिकाणी कोणत्याही प्रकारचे आंतररुग्ण दाखल होत नाहीत बहिस्थ रूग्णांची संख्या असल्यापेक्षा अधिक दाखविण्यात येत आहे. पितळवाडी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एका परिचारिकेने १०० हून अधिक बाळंतपणे केल्याचा दावा केला होता तर गरिबांचे धन्वंतरी डॉ. सोनावणे यांना शासनाने सेवानिवृत्तीत मुदतवाढ दिली असे असूनही आरोग्य उपकेंद्रांची अवस्था अतिशय बिकट आहे. सर्वत्र अनागोंदी सुरू असताना ग्रामीण रूग्णालयामध्ये आंतररूग्ण आणि बहिस्थ रुग्णांची संख्या समाधानकारक असताना गंभीर रूग्णांबाबत तसेच बाळंतिणींबाबत 'पुढे पाठवा' हे धोरण रुग्णांच्या जिवाशी खेळ ठरत आहे.

पोलादपूर तालुक्यातील वनविभागाकडून वणवाविरोधी सप्ताहाचे यंदा आयोजनच झाले नाही. वनविभागाचे असंख्य उपक्रम जनताभिमुख नसल्याने आणि मुख्य म्हणजे तालुका वनविभागाचे कार्यालय सरकारी भाड्याशिवाय चालवित असल्याचे वनसंरक्षकांचे म्हणणे असल्याने खिशातून भाडे भरण्यासाठी खिशामध्ये कोण निधी देतात, याची चौकशी होण्याची गरज आहे. तालुक्यात वणव्याचे प्रमाण अतिशय जास्त असून वनौषधीसह वन्यजीवांची तस्करी होत असताना वनविभागाचे कर्मचारी सपशेल दूर्लक्ष करीत असतात. जंगलतोडीवर कोणाचेही नियंत्रण नसून पोलादपूर तालुका या वनविभागातील बेकायदेशीर लाभार्थ्यांना मातब्बर अथवा गब्बर असा शेठ म्हणून ओळखू लागला आहे. तालुक्यातील दूर्गम भागात होऊ घातलेले जीप अथवा एकमार्गी वाहतुक होऊ शकेल असे रस्ते हे विकासाचा मार्ग नसून खैर आणि लाकूडतोडीसाठी सुकरता आणण्याचा प्रयत्न मानला जात आहे.

तालुक्यातील कायदा आणि सुव्यवस्था सुरळीत ठेवण्यात आली असून अज्ञात मृतदेह कोणाचा आणि दूर्गमस्थळी ओळख न पटण्यासारखा कसा पोहचला, यापेक्षा तो कोणी कसा काढला यातील समाजसेवेचा गुण चर्चेत आणायचा प्रकार सध्या होत आहे. अडविणारे नडणाऱ्यांना करा दोन नंबरचे धंदे मी दोन तीन वर्षे इथेच आहे, असे सांगून प्रोत्साहन देण्याचा प्रकारदेखील जोरात आहे. मोटरसायकलवरून किशोरवयीन मुले ट्रिपल सीट वेगाने जात असेल तर चेहरा लपवित बाजूला होणारे वाहतूक पोलीस त्या मुलांकडून होणाऱ्या अपघातांकडेही दूर्लक्ष करतात आणि त्यामुळे काही जणांचे झालेले नुकसान कधीही भरून न येणारे असल्याकडे कायद्याचे दूर्लक्ष अनेकांच्या जीवाशी खेळ ठरत आहे. मटका, जुगार, अवैध दारूविक्री, वेश्यागमन, भंगारचोरी, दुकानफोडी तसेच मोठया प्रमाणात सार्वजनिक इमारतींमधून अथवा रस्त्यामधून डेब्रिजची चोरी करणाऱ्यांना अभय देण्याचे काम कायदा आणि सुव्यवस्थेकडून नित्यनेमाने होत आहे. बदली होऊन गेलेले कर्मचारी तसेच बदली टळलेले कर्मचारी तालुक्यात वावरताना त्यांच्या वरकमाईसाठी आतुरलेले असल्याचे दिसून येत आहे.

पोलादपूर तालुक्यातील महसूल विभागाच्या कर्मचारी अधिकाऱ्यांना गेल्या काही वर्षांपासून हवे तशा बदल्या न मिळाल्याने ते चांगलेच स्थिरस्थावर झाले आहेत. महाड म्हसळा येथे गाजलेल्या बंटी आणि बबलीने पोलादपूर महसुल कर्मचाऱ्यांवर चांगला दबाव निर्माण करून अधिकारी वर्गाला खुश करण्यासाठी जनता आणि कार्यकर्त्यांचे दमन करण्याची भुमिका बजावली आहे. यापैकी बंटी अपंग आणि मागासवर्गीय असल्याने ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्याची भाषा करीत आहे. बबलीने निवडणूक विभागाचा कार्यभार सांभाळताना विजयी उमेदवाराऐवजी पराभूत उमेदवारांना विजयी घोषित करण्याचा निकाल देऊन पुन्हा निकाल फिरविल्याने तात्पूरत्या विजयी उमेदवारांना तीन दिवस उपोषणाला बसावे लागले होते. गॅझेटेड अधिकारी असलेल्या महिला तहसिलदारांनी चक्क पतीराजांना तालुकाभर मोकळीक देण्यासाठी नायब तहसिलदारांच्या आडनावातील साम्य लक्षात घेत सदर नायब तहसिलदारांना ऑफिस सोडण्यास मज्जाव करून खुपकाही माया गोळा केली. या कार्यालयातील एका महसुली कर्मचाऱ्याची तब्बल १३ वर्षांनी बदली झाली असून त्याला पुन्हा याच ठिकाणी येण्याची प्रबळ इच्छा दिसून येत आहे.

पोलादपूर तालुक्याचे ठिकाण असलेल्या ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रूपांतर झाल्यानंतर या नगरपंचायतीमध्ये जनतेचा सहभाग असणारी ग्रामसभा नसल्यामुळे याठिकाणी निवडून दिलेले नगरसेवक आणि नगरपंचायत प्रशासन यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव दिसून येत आहे. परिणामी, 'गाढवापुढे वाचली गीता अन् कालचा गोंधळ बरा होता' म्हणण्याची वेळ पोलादपूरवासियांवर येऊन ठेपली आहे. पोलादपूरची विस्तारित नळपाणीपुरवठा योजना कार्यान्वित होण्याऐवजी ठराविक भागातच पाणीपुरवठा करण्याचा प्रकार सुरू आहे. नव्याने विद्युतप्रकाश योजना करण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा सिमेंटकाँक्रीटचे बेसमेंट उभे करण्यात आल्याने रस्त्याची रूंदी कमी झाली आहे. वाहतुकीची कोंडी शहरात मोठ्या प्रमाणात सुरू आहे. शहराचे पूर्व आणि पश्चिम असे दोन भाग झाले आहेत. बेकायदेशीर बांधकामांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून अनेक सदनिकाधारकांची राजरोसपणे फसवणूक होत आहे. टाऊनप्लॅनिंग आणि डेव्हलपमेंट प्रोजेक्टस बाबत कोणाला काही देणंघेणं नाही. अनेकवेळा ज्या पदासाठी उपोषणं झाली ते मुख्याधिकारी पद यावेळी अरेरावी आणि दांडीखोर अशा स्वरूपाच्या सबलेच्या रूपाने मिळाल्याने पोलादपूरकरांचे हाल अधिकच वाढले आहेत.

पोलादपूर तालुक्यातील ग्रामीण भागाप्रमाणे पोलादपूर शहरामध्येदेखील नागरीकांच्या सनदेपेक्षा बाबूमोशायगिरी वाढीस लागली असून येत्या काळामध्ये पोलादपूरकरांचे भवितव्य पारतंत्र्यातील अथवा आणिबाणीतील नागरिकांच्या संकुचित स्वातंत्र्यासारखे होणार आहे.

## बदलते तंत्रज्ञान

# फेसबुक १०००० लोकांना कामावरून काढून टाकणार!



फेसबुकची मूळ कंपनी मेटा पुन्हा एकदा नोकर कपात करण्याच्या तयारीत आहे. ताज्या राऊंडमध्ये जवळपास १०,००० लोकांना बाहेरचा रस्ता दाखवला जाणार असल्याचे सांगितले जात आहे. मार्च २०२३ मध्ये, मेटा सीईओ मार्क झुकबर्ग यांनी १०,००० लोकांना नोकरीवरून काढून टाकण्याची घोषणा केली होती. आता कंपनी त्याच पावलावर पाऊल टाकत पुढे जात आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सॲप आणि रिॲलिटी लॅबमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करावे लागेल.

**कंपनीने व्यवस्थापकांना दिला आदेश**

दरम्यान, आपल्या माहितीसाठी, फेसबुक, इंस्टाग्राम आणि व्हॉट्सॲपची मालकी मेटाकडे आहे. ब्लूमबर्गच्या रिपोर्टनुसार, बुधवारी कंपनीने व्यवस्थापकांना जॉब कट मेमो तयार करण्यास सांगितले आहे. या तीन सोशल मीडिया कंपन्यांशिवाय, रिॲलिटी लॅबचाही समावेश केला जाऊ शकतो, जो व्हर्च्युअल रिॲलिटीवर आधारित विभाग आहे.

**सर्व टीमची पुनर्रचना केली जाईल**

व्यवस्थापकांना पाठवलेल्या मेमोमध्ये, कंपनीने संपूर्ण टीमला सुरवातीपासून तयार करावे असे वाटते. जे कर्मचारी उपलब्ध असतील त्यांना नवीन व्यवस्थापकांच्या खाली ठेवले जाईल. याशिवाय, मेटा कंपनी बुधवारी उत्तर अमेरिकेतील कर्मचाऱ्यांसोबत वर्क फ्रॉम होम करण्यासंदर्भात बोलू शकते, जेणेकरून कंपनीला थोडा वेळ मिळेल.

**११,००० लोकांना नोकरीवरून काढले**

मेटा कंपनीने नोव्हेंबर २०२२ मध्ये पहिली मोठी नोकर कपात केली होती. त्यादरम्यान कंपनीने ११,००० लोकांना कामावरून काढले होते. यामुळे मेटाचे कर्मचारी १३ टक्क्यांनी कमी झाले. तसेच, आता १०,००० लोकांची कपात केली जात आहे. अमेरिकन टेक फर्मने पहिल्या तिमाहीत नवीन भरतीवरही बंदी घातली आहे.

# एक प्रख्यात बासरीवादक पन्नालाल घोष

**विशेष**



पन्नालाल घोष हे एक प्रख्यात बासरीवादक होते. त्यांचे पूर्ण नाव अमल ज्योती घोष असे होते. त्यांनी बासरी या वाद्यात अनेक सुधारणा केल्या, तसेच बासरी वादन हे भारतीय गायकीच्या जवळ नेऊन ठेवले. पन्नालाल घोष यांचा आज स्मृतीदिन आहे. यानिमित्त त्यांच्याविषयी जाणून घेऊया या लेखातून...

पन्नालाल घोष यांचा जन्म २४ जुलै १९११ रोजी बारिसाल (बांगला देश) येथे झाला. पन्नालाल घोष यांचे वडील अक्षयकुमार घोष हे उत्तम सतारिये होते. वयाच्या १४व्या वर्षीच पन्नालाल बासरीकडे आकृष्ट झाले. पुढे १९३४ मध्ये पन्नालाल घोष यांनी मास्टर खुशी महम्मद या संगीतकाराचे शिष्यत्व पत्करले. 'सराईकेला नृत्यमंडळी'त ते काही काळ संगीत दिग्दर्शक होते. 'सराईकेला नृत्यमंडळी'बरोबर १९३८ मध्ये पन्नालाल घोष यांना युरोपचा प्रवास घडला. गिरिजा शंकर चक्रवर्ती ह्यांच्याकडे १९३९ मध्ये आणि पुढे १९४७ च्या सुमारास उस्ताद अल्लाउद्दीन खाँ ह्यांच्याकडे पन्नालाल घोष यांनी संगीताचे अधिक शिक्षण घेतले.

पन्नालाल घोष हे चित्रपटक्षेत्रात १९४० ते १९४४ ह्या काळात संगीत दिग्दर्शक म्हणून होते व पुढेही तेथेच १९५६ पर्यंत बासरीवादक होते. या काळात पन्नालाल घोष यांनी बासरीवादनाचे स्वतंत्र कार्यक्रमही केले. आकाशवाणीच्या दिल्ली केंद्रात १९५६ पासून पन्नालाल घोष हे वाद्यवृंद निर्देशक होते. पन्नालाल घोष हे १९४० साली मुंबई येथे वास्तव्यास होते. त्यांनी बॉम्बे टॉकीजमध्ये संगीत दिग्दर्शकाचे आणि बासरीवादनाचे काम केले. पन्नालाल घोष यांनी बासरीत आमूलाग्र परिवर्तन घडविले, बासरीची लांबी ४०-४२ इंचांपर्यंत वाढविली. तसेच बासरीवर बोटे ठेवण्याचे वेगळे तंत्र विकसित केले. तसेच पंडितजींनी अनेक नवीन रागांची निर्मिती केली त्यातील राग जयंत हा एक महत्त्वाचा राग आहे.

पन्नालाल घोष हे बासरीवादनाच्या क्षेत्रातील एक युगप्रवर्तक होत. वेणुवादनाला भारतात दीर्घकालीन इतिहास असला तरी बासरीवादनाला एक स्वतंत्र व स्वायत्त दर्जा मिळवून देण्यात पन्नालाल घोष यांचा फार मोठा वाटा होता. ख्यालगायनातील आलापासारखे विलंबित संगीतविस्तार आणि सतार, सरोद इ. तंतुवाद्यातील 'झाला' सारखे द्रुत वादनप्रकार या दोहोंना बासरीवादनात अंतर्भूत करून पन्नालाल घोष यांनी या वाद्याची सांगीतिक विकसनक्षमता विस्तृत केली.

यासाठी त्यांनी संशोधन करून मोठ्या व्यासाची, अधिक लांबीची व परिणामतः अधिक स्वरक्षेत्राची बासरी तयार केली. अर्ध, पाव इ. स्वरांतरे आणि मींडकामासारखे संगीतालंकार पन्नालाल घोष यांनी बासरीवादनातून यशस्वी करून दाखविले. संगीत दिग्दर्शक आणि रचनाकार म्हणूनही पन्नालाल घोष यांनी कीर्ती मिळविली. पन्नालाल घोष यांच्या इतजार, बसंत ह्या चित्रपटांच्या संगीतरचना व 'आशा', 'बागेश्री', 'ऋतुराज', 'कलिंगविजय', 'भैरवी', 'ज्योतिर्मय अमिताभ' इ. वाद्यवृंदरचना गाजल्या आहेत. त्यांच्या शिष्यगणांत हरिप्रसाद चौधरी, देवेंद्र मुर्डेश्वर, बेडा देसाई इ. प्रसिद्ध बासरीवादकांचा समावेश होतो. अशा या श्रेष्ठ बासरीवादकाचे २० एप्रिल १९६० रोजी निधन झाले.

**(साभार : मायमहानगर)**


**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : तापमान कमालीचे वाढल्याने सारेच हैराण झाल्याचे प्रकर्षाने जाणवत आहे. दिवसेंदिवस वाढणारी उन्हाची तीव्रता कमी करण्यासाठी नागरिक लिंबू पाणी, निरा पिण्यासाठी गर्दी करू लागले आहेत.** (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर

# जाणून घेऊया गायीचे तूप खाण्याचे फायदे



तूप अन्नाची चव वाढवण्याचे काम करते, परंतु बरेच लोक ते खाणे टाळतात. कारण तूप खाल्ल्याने वजन वाढते असे लोकांना वाटते. पण तुम्हाला माहित आहे का की गायीचे तूप खाल्ल्याने तुमचे वजन वाढत नाही तर ते कमी होते. कारण गाईच्या तुपात कॅल्शियम, मिनरल्स आणि असे अनेक घटक असतात जे वजन कमी करण्याचे काम करतात. जर तुम्हालाही वजन कमी करायचे असेल तर आजपासूनच गायीच्या तुपाचे सेवन सुरू करावे. चला तर मग जाणून घेऊया की गायीचे तूप खाण्याचे कोणते फायदे आहेत?

आयुर्वेदानुसार गायीचे तूप आपल्या शरीराच्या आतील अवयवांनाही खोलवर पोषक घटकांचा पुरवठा करण्याचे कार्य करते आणि आपल्या मेंदूची कार्यप्रणालीही चांगली ठेवण्यात मदत करते . तसेच गाईच्या दुधापासून तयार केलेले तूप नैसर्गिक औषधी गुणधर्मांनी समृद्ध असते. यामध्ये अतिशय मर्यादित प्रमाणात आणि पौष्टिक चरबीचा समावेश असतो. म्हणूनच गायीच्या तुपामुळे मेंदू आणि शरीराला नैसर्गिक स्वरुपात पोषण तत्त्वांचा पुरवठा होण्यास मदत मिळते. शरीरामध्ये लवचिकता टिकवून ठेवण्यासाठी गरम दुधासह गायीच्या तुपाचे सेवन करावे. पण हा उपाय करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. दरम्यान, दुसरीकडे म्हशीच्या दुधापासून तयार केलेल्या तुपाचे सेवन केल्यास शरीरामध्ये चरबी वाढण्यास सुरुवात होते.

**अशक्तपणा दूर :** जर तुमच्या शरीरात नेहमी अशक्तपणा असेल तर तुम्ही गायीच्या तुपाचे सेवन करावे. यासाठी एक ग्लास दुधात अर्धा चमचा गायीचे तूप मिसळून प्यावे. याचे दररोज सेवन केल्याने अशक्तपणाच्या समस्येपासून मुक्ती मिळू शकते.

**लो कोलेस्ट्रॉल :** गायीचे तूप आपल्या शरीरासाठी खूप फायदेशीर आहे. त्याचबरोबर गायीच्या तुपाचे सेवन केल्याने कोलेस्टेरॉल कमी होण्यास मदत होते हे तुम्हाला माहित आहे का? कारण तुपात ब्युटिरिक सिड असते जे आतड्यांना मजबूत करण्याचे काम करते आणि कोलेस्ट्रॉल कमी करते.

**वजन कमी करणे :** तुपात अमिनो सिड असतात जे वजन कमी करण्यास मदत करतात.

**त्वचा सुधारण्यास मदत :** गायीच्या तूपात भरपूर अँटीऑक्सिडंट्स असतात जे फ्री रॅडिकल्सशी लढून त्वचेला चमक आणण्याचे काम करतात. त्यामुळे जर तुमच्या त्वचेचा ओलावा कमी झाला असेल तर दररोज गायीच्या तुपाचे सेवन करा. यामुळे तुमची त्वचा चमकदार होईल.

# राजा केणी, शैलेंद्र पाटील यांचे अर्ज वैध

## एपीएमसी निवडणुकीत शिंदे गटाला दिलासा

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीच्या रिंगणात पहिल्यांदाच उतरलेल्या शिवसेना शिंदे गटाचे छाननीत बाद केलेले दोन अर्ज जिल्हा उपनिबंधक यांनी वैध ठरवले आहेत. जिल्हाप्रमुख राजा केणी व शैलेंद्र पाटील या दोघांचे अर्ज वैध ठरल्याने शिंदे गटाला मोठा दिलासा मिळाला आहे. दरम्यान उर्वरीत दोन अर्जांवरील निर्णय येणे अद्याप बाकी आहे.

अलिबाग एपीएमसीच्या निवडणूक प्रक्रियेत ५ एप्रिल रोजी उमेदवारी अर्जांची छाननी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहणारे सहायक निबंधक अशोक मोरे यांच्यासमोर झाली. त्यावेळी जिल्हाप्रमुख राजा केणी यांच्यासह शैलेंद्र पाटील, प्रियांका घातकी, व सागर पाटील या चार उमेदवारांचे अर्ज छाननीत ठरवण्यात आले . त्यांच्या अर्जावर शेकापने आक्षेप घेतला होता. तर शिंदे गटाने शेकापच्या उमेदवारांच्या अर्जावर घेतलेले आक्षेप निवडणूक निर्णय अधिकारयांनी फेटाळून लावले आहेत. यामुळे शिवसेना शिंदे गटाला मोठा धक्का बसला होता. शिंदे गटाच्या उमेदवारांनी आपल्या उमेदवारी अर्जांबरोबर आवश्यक ते दाखले जोडले नसल्याने त्यांचे उमेदवारी अर्ज बाद करावेत असा आक्षेप शेकापकडून घेण्यात आला. हा आक्षेप मान्य करीत चार उमेदवारांचे अर्ज अवैध ठरवण्यात आले.

या निकालाविरोधात शिंदे गटाने जिल्हा उपनिबंधक यांच्याकडे दाद मागितली. यावर झालेल्या सुनावणीत शिंदे गटातर्फे ॲड. सुशील पाटील व ॲड. मनोज पाटील यांनी जोरदार युक्तीवाद केला. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर जिल्हा उपनिबंधक स्मिता गायकवाड यांनी राजा केणी व शैलेंद्र पाटील यांचे अर्ज वैध ठरवले आहेत. तर प्रियांका घातकी व सागर पाटील यांच्या अपीलावरील निर्णय अद्याप प्रलंबित आहे.

या निवडणूकीसाठी २८ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. तत्पूर्वी २१ एप्रिल रोजी चिन्ह वाटप केले जाणार आहे. चिन्ह वाटप होण्यापूर्वी उर्वरीत दोन अर्जांवरील निकाल अपेक्षित आहे. या निवडणूकीत शेकाप सर्वच्या सर्व म्हणजे १८ जागा लढवत आहे तर शिंदे गटाने ७ जागांसाठी उमेदवारी अर्ज दाखल केले होते.

अलिबाग तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीवर गेली अनेक वर्षे शेकापची निर्विवाद सत्ता आहे. परंतु विरोधकांनी कधीही ही निवडणूक लढवण्याचे धाडस दाखवले नाही. यावेळी प्रथमच शिंदे गटाने ही निवडणूक लढवण्याचा निर्णय घेत उमेदवारी अर्ज दाखल केल्याने एरव्ही कुठलाही गाजावाजा न होता पार पडणारी निवडणूक पहिल्यांदाच चर्चेत आली.

> **या निवडणूकीत बाजार समितीच्या कर्मचारयांना हाताशी धरून आम्हाला निवडणूक रिंगणातून बाहेर काढण्याचा शेकापचा डाव होता परंतु जिल्हा उपनिबंधक यांच्या निकालाने त्यांच्या स्वप्नांवर पाणी पडले आहे. ही निवडणूक आम्ही सर्वशक्तीनिशी लढून आमची ताकद दाखवून देवू.**
> **–राजा केणी, जिल्हाप्रमुख, शिवसेना शिंदे गट**

# अलिबाग येथे २५ रोजी सामाजिक न्याय पर्व अंतर्गत कार्यशाळा

**अलिबाग : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय पर्व कार्यक्रमांतर्गत मंगळवार २५ एप्रिल रोजी जंजिरा हॉल, पोलीस ग्राऊड, अलिबाग येथे या ठिकाणी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा, सफाई कर्मचारी व त्यांचे पुनर्वसन कायदा २०१३ जनजागृती, अंधश्रध्दा निर्मूलन कायद्याबाबत जनजागृती करणे, व्यसनमुक्ती प्रचार व प्रसार, या विषयांची कार्यशाळा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे.

कार्यशाळेचे उदघाटन जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या हस्ते करण्यात येणार असून कार्यशाळेसाठी समाज कल्याण, पोलीस विभाग आणि महसूल विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सुनील जाधव यांनी दिली आहे.

# पेणमधील सात ग्रामपंचायतींना आयएसओ मानांकन

## जिल्ह्यातील ५० ग्रामपंचायतींची आयएसओकडे वाटचाल

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील सात ग्रामपंचायतींना एकाचवेळी आयएसओ मानांकन प्राप्त झाले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील व सामान्य प्रशासन विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी निलेश घुले यांच्या हस्ते संबंधित ग्रामपंचायतीच्या सरपंचांना आयएसओ मानांकन प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

पेण तालुक्यातील बोर्जे, कांदळे, निगडे, गागोदे खुर्द, वाक्रुळ, वरप, मसद बुद्रुक या ग्रामपंचायतींना आयएसओ मानांकन प्राप्त झाले आहे. विशेष म्हणजे जानेवारी २०२३ पासून जिल्ह्यातील १५ ग्रामपंचायतींनी आयएसओ मानांकन प्राप्त केले आहे. तसेच जिल्ह्यातील आणखी ५० ग्रामपंचायतींची आयएसओ मानांकन प्रमाणपत्र मिळवण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरू आहे. जिल्ह्यातील ग्रामपंचायत कार्यालयाचे सुशोभीकरण, ग्रामपंचायतींचे रेकॉर्ड अद्ययावत ठेवणे, स्वच्छतागृहे बांधणे, गावात साफसफाई असणे, गावात व्यायमशाळा, स्वच्छ पाणीपुरवठा करणे, घरपट्टी पाणीपट्टी वसुली, ग्रामसभांत नियमित विषयांवर चर्चा, गावात वृक्षारोपण करणे यासह इतर शासकीय योजना राबवण्यावर भर देण्यात येत आहे, या सर्व बाबींकडे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील सातत्याने पाठपुरावा करीत होते.

जिल्ह्यात उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना आयएसओ करण्यासाठी व्हि. एन.टेक्नो. रिसर्च प्रा.लि. कंपनीची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. या सर्व प्रयत्नांना यश मिळाले असून, जानेवारी महिन्यात जिल्ह्यातील बोरीस गुंजीस, सातीर्जे, सारळ ग्रामपंचायतींना आयएसओ मानांकन प्राप्त झाले होते. यानंतर फेब्रुवारी महिन्यात अलिबाग तालुक्यातील कामार्ली उरणमधील पुनाडे व दिघोडे तसेच पेण तालुक्यातील उंबर्डे या चार ग्रामपंचायतींना तर मार्च महिन्यात नागाव ग्रामपंचायतीला आएसओ मानांकन प्राप्त झाले आहे.

शासन व्यवहारात पारदर्शकता तसेच गतिमानता यावी यासाठी ई गव्हर्नन्सचा वापर केला जात आहे. ग्रामपंचायतीमधील विविध रजिस्टर्स,फॉर्मस, दस्ताऐवजांचे संगणकीकरण करून पेपरलेस ग्रामपंचायतींकडे वाटचाल सुरू आहे. बदलत्या परिस्थितीत ग्रामपंचायतींच्या कार्यपद्धतीचे पुनर्विलोकन करून व्यवसाय प्रक्रिया पुनर्निर्मिती करण्याची गरज आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रशासकीय कामकाज कार्यक्षम व्हावे आणि कार्यपद्धतीत गुणात्मक सुधारणा करण्यासाठी आयएसओ प्रमाणिकीकरण करण्याचा निर्णय राज्य सरकारने २०१९ मध्ये घेतला आहे. त्यानुसार जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना आयएसओ मानांकन मिळावे, यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने पुढाकार घेतला आहे.

# गाठेमाळ शाळेला मिळाली उर्जितावस्था : समाजसेवी संस्थांच्या माध्यमातून कायापालट

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यातील गाठेमाळ शाळेची निसर्ग व तोक्ते वादळात पडझड झाली होती. अनेक समस्यांनी शाळेला वेढले होते. त्यातच कोरोना व आर्थिक मदतीच्या अभावाने शाळेत आवश्यक डागडुजी करणे ही शक्य होत नव्हते. मात्र शाळेचे मुख्याध्यापक सागर शिंदे व शिक्षिका आशा आर्डे यांनी शाळेला उर्जितावस्था प्राप्त करण्यासाठी कंबर कसली व दाते आणि समाजसेवी संस्थांच्या माध्यमातून आता शाळेचा आमूलाग्र कायापालट घडवून आणला आहे.

मुख्याध्यापक सागर शिंदे यांनी माहिती देताना सांगितले की, निसर्ग वादळात शाळेची पडझड झाली, तोक्ते वादळात शाळेचे शौचालय पडले. किचन नादुरुस्त झाले, कोरोनो काळ संपल्यावर शाळेला तातडीने मदतीची गरज होती. या दोन वर्षात चांगली दिसणारी शाळा पूर्णपणे खराब दिसू लागली होती. भिंतीचे प्लास्टर गळून पडले होते. वर्गखोली गळायला लागली होती. पावसाळ्यात अक्षरशः वर्गात बादल्या ठेवाव्या लागत होत्या. गळणारे पाणी बादल्यात पडत होते. अध्यापन करत असतांना या सर्व गोष्टी सांभाळण्यात बराचसा वेळ जात होता. अशा परिस्थिती मध्ये शाळेचे रूप पालटुन आवश्यक व चांगल्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता होती. अशातच हर्षदा दईसरिया यांच्याकडून शाळेला पहिली मदत मिळाली. त्यांनी शौचालय व किचन शेड दुरुस्त करून दिले.






प्राइड इंडिया या संस्थेकडून पुढे मदत मिळाली. त्यांनी गळणाऱ्या वर्गखोली वर पत्रे टाकून दिले. त्यामुळे पावसाचे गळणारे पाणी पूर्णपणे थांबले. प्राइड इंडियाकडून एका वर्गखोली आतून बाहेरून सुरेख व आकर्षक रंगरंगोटी करून मिळाली. गळणारी व पावसाळ्यात सतत बादल्या ठेवावी लागणारी वर्ग खोली सुरेख झाली. त्यामुळे मुलांनाही शिकण्यात आनंद मिळू लागला.

प्राइड इंडिया कडून शाळेला प्रोजेक्टर व वॉटर फिल्टर मिळाला. मुलांना हाथ धुण्यासाठी वॉश स्टेशन करून मिळाले. तसेच हर्षदा दईसरिया यांच्या कडून शाळेच्या दोन्ही वर्ग खोल्यांसाठी सोलर पॅनल मिळाले, त्यांनीच दोन्ही वर्गखोल्यांमध्ये फॅन देखील उपलब्ध करून दिले.

शाळेसाठी इतर अनेकांनी मदत केली. कपाट, टेबल, खुर्च्या खेळाचे साहित्य देखील शाळेला मिळाले. मुंबईच्या निराली झवेरी यांच्याकडून मुलांसाठी पझल गेम, शालेय साहित्य, चप्पल स्टँड, चटया मिळाल्या. तसेच अंबरीश आंबेगावकर यांच्याकडून शालेय साहित्य मिळाले. अशा प्रकारे शाळेचा कायापालट झाला.

प्रत्येकाने पुस्तके वाचली पाहिजेत व वाचन संस्कृती जोपासली पाहिजे हा यामागील उद्देश आहे. आणि याच भावनेने हा उपक्रम वर्षभर शाळेत राबवण्यात आला. शाळेचे यू ट्यूब चॅनल असून त्यावर शाळेचे उपक्रमाचे अनेक व्हिडिओ सुद्धा उपलब्ध आहेत.

> **अनेक सामाजिक संस्था व दात्यांनी मिळून शाळेला सर्वतोपरी सहकार्य केले आहे. अजूनही मदतीचा ओघ सुरू आहे. यामुळे शाळेचे रूप पालटले आहे. विद्यार्थ्यांना आवश्यक सेवासुविधा मिळतात. डिजिटल संसाधनांच्या माध्यमातून विद्यार्थी ज्ञानकण गिरवितात. यामुळे विद्यार्थी शाळेत रमू लागली आहेत.**
> **–सागर अर्जुन शिंदे,** मुख्याध्यापक, गाठेमाळ शाळा

### पुस्तक भेटीचा उपक्रम

मुख्याध्यापक सागर शिंदे व शिक्षिका आशा आर्डे यांनी शाळेमध्ये गेल्या वर्षापासून एक अनोखा उपक्रम राबविला आहे. शाळेस भेट देणाऱ्या अधिकाऱ्यांना, शिक्षकांना, रंगकाम करणाऱ्यांना, तसेच ज्यांनी शाळेस मदत केली त्यांना पुस्तक भेट दिली जाते.

# पोलादपूर तहसील कार्यालयाच्या दोन कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्याच्या महसूल विभागाकडून अनेक वर्षांपासून सुरू असलेली मनमानी माहितीच्या अधिकाराच्या अर्जातून उघडकीस आणून कारवाईच्या अपेक्षेने तहसिल कार्यालयामध्ये पाठपुरावा केला असता महसूल कार्यालयामधील दोन कर्मचाऱ्यांनी आरटीआय कार्यकर्त्यांना अवैध धंदे करणाऱ्यांना तुमचे हात पाय तोडून टाकायला सांगू, अशी धमकी दिली. याप्रकरणी, पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये दोन आरटीआय कार्यकर्त्यांनी तक्रार दिली असता अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलादपूर तालुक्यात विनापरवाना विटभट्टया राजरोसपणे सुरू असून

### आरटीआय कार्यकर्त्याला धमकीप्रकरण

पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होत असल्याची बातमी विविध वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द झाल्यानंतर याप्रकरणी माहितीचा अधिकाराचे कार्यकर्ते आणि लोकसेवा समर्पित प्रतिष्ठानचे अध्यक्ष विश्वास हरिचंद्र नलावडे हे सचिव योगेश मधुकर भोसले यांच्यासमवेत पोलादपूर तहसिल कार्यालयामध्ये गेले असता याप्रकरणी कारवाईसाठी पाठपुरावा केला. विश्वास नलावडे यांना माहितीचा अधिकार अर्जाच्या उत्तरामध्ये १० मार्च रोजी पोलादपूर तहसिल कार्यालयातून पोलादपूर तालुक्यातील एकाही विटभट्टीसाठी परवानगी दिली नसल्याची माहिती प्राप्त झाली होती. याअनुषंगाने नायब तहसिलदार समीर देसाई यांनी विटभट्टीधारकांविरूध्द कारवाईची कामे सह्यांसाठी प्रलंबित असल्याचे सांगितले. यावेळी महसूली कर्मचारी कांबळे आणि चांदोरकर यांनी एकत्रितपणे आरटीआय कार्यकर्ते माहितीचा अधिकाराचे कार्यकर्ते आणि लोकसेवा समर्पित प्रतिष्ठानचे अध्यक्ष नलावडे आणि सचिव भोसले यांना या कपाटावर जेवढी कलमे आहेत; ती या दोघांना लावून कारवाई करायला हवी,असे कांबळे यांनी धमकावले तर चांदोरकर यांनी आमच्या संघटनेतर्फे आणि विटभट्टीमालकांना सांगून हात पाय तोडून बंदोबस्त करायला सांगू, अशा शब्दांमध्ये धमकी दिली.

# अलिबाग तालुक्यात ड्रोन सर्व्हे सनद वाटप

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्ह्यातील उप अधीक्षक भूमी अभिलेख अलिबाग या कार्यालयाकडील अलिबाग तालुक्यातील १४० गावाचे स्वामित्व योजनेंतर्गत ड्रोन सर्व्हे झालेला आहे. साधारण ८० गावांचे चौकशी काम पूर्ण झाले आहे. चौकशी कामानुसार १३ गावाचे सनद (मालकी हक्काचा पुरावा) हा तयार झालेला असून ते सर्व घराचे मालक, धारक यांना वाटपाचा विशेष कार्यक्रम आयोजित केला आहे.

अलिबाग तालुक्यातील १४० गावांची सनद तयार करून शंभर टक्के लोकांना त्यांच्या घरापर्यंत सनद मे २३ अखेर पोहचविण्याचे उद्दिष्ट उपसंचालक भूमी अभिलेख कोकण प्रदेश, कोकण (मुंबई) जयंत निकम यांनी अलिबाग तालुक्याला दिलेले असून त्यानुषंगाने जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख अलिबागसचिन इंगळी यांच्या मार्गदर्शनानुसार अलिबाग तालुक्यात विशेष मोहीम घेऊन प्रत्येक गावात सनद वाटप कार्यक्रम सुरु केला आहे असून त्यास जनतेचा चांगला मिळत आहे. या कामी वसुलीसाठी उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाचे शिरस्तेदार श्री.बाळासाहेब दुरगडे यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक केली आहे. त्याचप्रमाणे संबंधित गावांचे ग्रामविकास अधिकारी यांच्या सहकार्याने सनद वसुली झालेली आहे. याकामी सर्व मोहिमेचे नियोजन व जनतेच्या शंका समाधान कामी उपअधीक्षक भूमी अभिलेख अलिबाग प्रदीप जगताप स्वतः हजर राहून कामकाज पाहत आहेत.


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender Specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated Cost | Submission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-11/23-24/ **RFx No. 7000026992** | Supply of various consumables items at 400 KV R.S. Nagothane s/s under 400 KV R.S. O&M Division, Nagothane... **1st Ext...** | Rs. 3,27,664/- | 25.04.2023 up to 23:59 Hrs. |

**EMD**: Rs. 5000/- **Tender Fee:** Rs. 500/- + GST. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** Mitesh Goyal (DY. EE) Mob No. 9461456635
e-mail ID: **ee7230@mahatransco.in**
**Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**400kV R.S. (O&M) Dn., Nagothane**



## जाहीर नोटीस

माझ्या अशिलांच्या वतीने सर्व जनतेस या नोटीसिद्वारे असे सुचित करण्यात येते कि, खालील भुखंडाचे मालक **(१) श्रीमती. कुसुम हरीभाऊ नाईक (२) श्री. मधुकर हरीभाऊ नाईक, (३) श्री.आदेश हरीभाऊ नाईक, (४) सौ.अरूणा दिपक भोईर व (५)सौ.प्रमोदीनी महेश पाटील,** यांच्या नावे सिडकोकडून प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामासाठी गावठाणामधिल संपादीत करण्यात येणाऱ्या जमिनीबद्दल व त्यामधील स्थलांतरीत होणाऱ्या निवासी वापराच्या बांधकामाबद्दल नुकसान भरपाईपोटी व पुनःस्थापनेसाठी निवासी वापराकरीता **भुखंड क्र. १७३, सेक्टर ०३, क्षेत्र १५०.०० चौ.मी.** नोड, पुष्पक नगर, दापोली, नवी मुंबई, ता. पनवेल, जि. रायगड या वर्णनाचा भुखंड वितरीत झालेला आहे. सदर भुखंड माझे अशिल **मे. दुबे होम्स प्रा. लि. तर्फे संचालक (१) श्री. दयाशंकर रामचंद्र दुबे, (२) श्री. सचेंद्र दयाशंकर दुबे व (३) श्री. नयरीत सचेंद्र दुबे,** कार्यालयिन पत्ता– फ्लॅट नं. १०१, गायत्री पॅराडाईज, प्लॉट नं. ५६, सेक्टर ०३, करंजाडे, पारगाव, पनवेल ४१० २०६. नवी मुंबई. यांच्या नावे खरेदी विक्रीच्या करारनाम्याद्वारे/त्रिपक्षिय करारनाम्याद्वारे कायमस्वरूपी हस्तांतरण करीत आहेत.

| नोड | सेक्टर | भुखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| पुष्पक (दापोली) | ०३ | १७३ | १५०.०० चौ.मी. |

तरी कोणीही व्यक्ती/ व्यक्तीचे किंवा अर्थिक संस्थांचे सदर भुखंड संदर्भात कुठल्याही प्रकारचे दावा, हरकती, जसे विक्री, बोजा, दान, गहाण, सरकारी निमसरकारी, कंपनी बक्षीस भाडेपट्टा, वारसा हक्क, लोन किंवा इतर काही असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाचे आत या भुखंडाच्या संबंधित कागद पत्रासोबत माझ्या कार्यालयिन पत्त्यावर संपर्क साधावा. अन्यथा सदर भुखंडाच्या त्रिपक्षिय करारनाम्याद्वारे हस्तांतरण करण्याची प्रक्रीया पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर आलेल्या कुठल्याही प्रकारच्या हरकती/तक्रारीचा विचार करण्यात येणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

दिनांक : १९/०४/२०२३

**सही/–**
**ॲड. निरंत वासुदेव पाटील**

कार्यालय : तळ मजला, प्लॉट नं. बी४०, से.२०, अष्टविनायक बिल्डींग, नेरूळ गाव, नवी मुंबई. ४००७०६. मो.९३२४५६९८०६.


# जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षकाची मुलगी बनली कृषी अधिकारी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद मधील शाळेचे शिक्षक राजेंद्र आढाव यांची मुलगी राज्य लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झाली आहे. नेहा राजेंद्र आढाव या लोकसेवा आयोगाची परीक्षा पहिल्याच प्रयत्नात पास होऊन थेट तालुका कृषी अधिकारी बनल्या आहेत.



जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक असलेले राजेंद्र आढाव यांची मुलगी नेहा हिने राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठात कृषी पदवी तसेच पदवित्तर शिक्षण घेतले आहे. कृषी विस्तार आणि संज्ञापन मध्ये एमएससी पर्यंत शिक्षण घेणारे नेहाने २०२१ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा दिली होती.तालुका कृषी अधिकारी पदाची परीक्षा देणाऱ्या नेहाने पहिल्याच प्रयत्नात यश मिळविले आहे. २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या एमपीएससी परीक्षा २०२१ चा निकाल जाहीर झाला आहे. या परीक्षेत कर्जत तालुक्यातील एका जिल्हा परिषद शाळेचे शिक्षकाची मुलगी यशस्वी ठरली आहे.

नेहा राजेंद्र आढाव यांनी एमपीएससी मध्ये पहिल्याच प्रयत्नात यशस्वी होत तालुका कृषी अधिकारी वर्ग दोन म्हणून आपली वर्णी लावली आहे. त्यामुळे नेहा आढाव यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. एका जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षकाच्या मुलांनी एमपीएससी परीक्षेत यश मिळविल्याने सर्व विद्यार्थ्यांना हेवा वाटावे असेच आहे.


## पनवेल महानगरपालिका
## जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १. | श्री. विलास मोतीराम जोगदंड, प्लॉट नं–४०, बावन बंगला,पनवेल | ०१ आंब्याचे झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं–४०, बावन बंगला, पनवेल येथे ०१ आंब्याचे झाड हे नवीन इमारत बांधकामास अडथळा निर्माण करीत आहे. |
| २. | श्री. राजेश हिरालाल नकुमपरमार, प्लॉट नं–१५, सेक्टर – ३५ I, नोड खारघर | ०१ बोरीचे झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं–१५, सेक्टर – ३५ I, नोड खारघर येथे ०१ बोरीचे झाड हे नवीन इमारत बांधकामास अडथळा निर्माण करीत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सूचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**जा. क्र.पमपा/उद्यान/२१२३/प्र.क्र.५५/३०४/२०२३**
**दिनांक १८/०४/२०२३**

**सही/–**
**उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

# भुरट्या चोरांवर बसणार चाप

## सानपाडामध्ये अतिरिक्त सीसीटीव्ही झाले कार्यान्वीत

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिकेकडे सातत्याने पाठपुरावा केल्याने अतिरिक्त सहा सीसीटीव्ही कॅमेरे सानपाडा परिसरात बसवल्याने स्थानिक नागरिक विशेषतः महिला वर्गाने समाधान व्यक्त केले आहे.

सुनियोजित शहर असलेल्या सानपाडा विभागामध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून चोरीच्या घटनांमध्ये वाढ झालेली आहे. सकाळी आणि संध्याकाळच्या वेळी महिला फेरफटका मारण्यासाठी घराच्या बाहेर पडलेल्या असतात, तर दुपारच्या वेळी कामानिमित्त बाहेर जाणाऱ्या महिलाची संख्या सानपाडामध्ये मोठी आहे. वाढत्या चोरीला आळा बसावा यासाठी स्थानिक नागरिकांनी मोक्याच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यची मागणी भाजपचे माजी परिवहन सदस्य विसाजी लोके यांच्याकडे केली होती. लोके यांनी नवी मुंबई मनपाकडे सातत्याने पाठपुरावा केल्याने अतिरिक्त ६ सीसीटीव्ही कॅमेरे सानपाडा परिसरात बसवल्याने स्थानिक नागरिक विशेषतः महिला वर्गाने समाधान व्यक्त केले आहे .

सानपाडा येथील महिला बाहेर पडतांच क्षणी त्यांच्यावर भुरट्या चोरांची करडी नजर पडलेली असते. कमी वर्दळ असलेल्या रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र, हातातील बांगड्या, पर्स खेचून घेऊन पळून जाणाऱ्या चोरांची संख्या वाढत चाललेली आहे. या भुरट्या चोरांना आळा बसवण्यासाठी सानपाडा विभागातील अनेक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले, मात्र ह्या चोरांचे प्रमाण काही कमी झाले नाही. घराच्या बाहेर पडले की आपली वस्तू कोणीतरी खेचून नेणार अशी धडकीच सानपाडा विभागातील महिलांना भरली आहे. अनेक महिलांनी या विषयी पोलीस तक्रार दाखल केलेली आहे, मात्र या चोरीच्या प्रमाणावर अद्याप कुठे आळा बसलेला नाही. त्यामुळे सानपाडा शहरातील महिला संताप व्यक्त करत आहेत.

गेल्या काही दिवसांपासून सतत वाढत चाललेले चोरीचे प्रमाण हे प्रामुख्याने छत्रपती शिवाजी महाराज चौका पासून रायन स्कूल, एमटीएनएल कार्यालय, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नवी मुंबई महापालिका 'डी वार्ड कडे जाणारा रस्ता, अष्टविनायक सोसायटी कडे जाणारा रस्ता या परिसरात अधिक आहे. येथे कायम रहदारी चालू असते, अशावेळी सकाळी किंवा रात्री संधी साधून महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र, दागिने, हाता मधील मोबाईल, पर्स खेचून बाईक वरून येणारे चोर सुसाट पळ काढत आहेत.

या सर्व प्रकारांला आळा बसण्यासाठी जर सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित असेल तर पोलिसांना अशा यंत्रणेमुळे तपास करण्यात निश्चितच फायदा होईल. या स्थळी सीसीटीव्ही कॅमेरे असल्यास चोरीचे वाढते प्रमाण कमी होईल . चोरांना प्रतिबंध करता येईन यासाठी स्थानिक रहिवासी व बाधित व्यक्ती लोकप्रतिनिधीकडे सीसीटीव्ही कॅमेरा बसवून घेण्यासाठी आग्रह करत आहेत. स्थानिकांची मागणी रास्त असून लोक आग्रहास्तव छत्रपती महाराज चौक सानपाडा सेक्टर १० या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरा यंत्रणा बसवून रहिवाशांचे होणारे नुकसान व मनातील भीती दूर करण्यासाठी अतिरिक्सीटीव्ही कॅमेरे बसुन देण्याची मागणी माजी परिवहन समिती सदस्य विसाजी लोके यांनी मनपाकडे केली होती. विसाजी लोके यांच्या प्रयत्नांना यश येऊन नवी मुंबई महापालिकेने सानपाडा परिसरात अतिरिक्त कॅमेरे बसवून दिले आहेत.





### नागरिकांनी व्यक्त केले समाधान

**सीसीटीव्हीचा निश्चितच फायदा नागरिकांना विशेषतः महिला वर्गाला होऊन चोरीच्या प्रमानाला आळा बसेल. सानपाडामधील स्थानिक रहिवासी व बाधित व्यक्तींनी विसाजी लोके यांच्याकडे सीसीटीव्ही मनपाच्या मार्फत बसवण्यासाठी आग्रह धरला होता. आता परिसरातील छत्रपती महाराज चौक, सानपाडा सेक्टर १० सह महत्वाच्या सहा अतिरिक्त ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरा यंत्रणा बसवून रहिवाशांचे होणारे नुकसान व मनातील भीती दूर झाल्याचे समाधान नागरिकांत आहे.**

# नवी मुंबईत कोरोना रुग्ण वाढले; नियमांचे पालन करण्याचे आवाहन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



नवी मुंबई शहरात कोरोनाबाधितांची संख्या दिवसाला ३० ते ४० च्या दरम्यान येऊ लागली असून करोनाबाधितांनी काळजीपूर्वक रित्या पाच दिवसांच्या विलगीकरणात राहण्याचे आवाहन पालिकेने केले आहे.

दिवसेंदिवस कोरोना रुग्णांची संख्या वाढत आहे. त्यामुळे कोरोना रुग्णांची वाढती संख्या पाहता करोना विषाणूच्या प्रसाराला रोखण्यासाठी तपासणी, विलगीकरण व उपचार या त्रिसूत्रीच्या अनुषंगाने कार्यवाहीचे निर्देश पालिका आयुक्तांनी आढावा बैठकीत दिले होते. त्यानुसार करोना चाचण्यांमध्ये वाढ करण्याकडे विशेष लक्ष देण्यात आले असून सरासरी दिवसाला दोन हजार चाचण्या केल्या जात आहेत.

नवी मुंबई शहरात सर्दी, खोकला व तापावरील उपचारासाठी महानगरपालिकेच्या रुग्णालयात अथवा नागरी आरोग्य केंद्रात येणाऱ्या लक्षणे असलेल्या आजारी व्यक्तींची कोरोना चाचणी करण्यात येत असून आयएलआर आणि सारी रुग्णांचीही करोना चाचणी करण्यात येत आहे. पालिका क्षेत्रातील नवी मुंबई महापालिकेची २३ प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रे व ४ रुग्णालये या ठिकाणी करोना चाचण्या केल्या जात असून नेरूळ येथील माँसाहेब मिनाताई ठाकरे रुग्णालयातील आरटी–पीसीआर प्रयोगशाळा २४ तास पूर्ण क्षमतेने कार्यांन्वित आहे.

या ठिकाणाहून आरटी–पीसीआर टेस्टचे रिपोर्ट २४ तासाच्या आत संबधित व्यक्तीस एसएमएस संदेशाव्दारे लिंक पाठवून उपलब्ध करून दिले जात असून कोरोना चाचणी सकारात्मक येणाऱ्या रुग्णांना पाच दिवसांचे गृहविलगीकरण सूचित करण्यात आले आहे.

**चाचण्यांवरही भर**

कोरोना रुग्णसंख्येची आसपासच्या शहरात वेगाने होणारी वाढ लक्षात घेता नवी मुंबई महापालिकेच्या संपूर्ण आरोग्य यंत्रणेने सतर्कता राखण्याची गरज लक्षात घ्यावी आणि टेस्टींगवर भर द्यावा व कोरोना प्रतिबंधात्मक पावले उचलावीत असे निर्देश सर्व वैद्यकिय अधिकाऱ्यांना देतानाच नागरिकांनीही करोना प्रतिबंधात्मक नियमांचे विशेषत्वाने गर्दीच्या ठिकाणी व रुग्णालयात जाताना पालन करावे, असे आवाहन महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी केले आहे.

# कोपरखैरणेत सोनसाखळ्या चोरांचा सुळसुळाट

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पाच मिनिटांच्या अंतराने दोन महिलांच्या गळ्यातील सोनसाखळी चोरी झाल्याचा प्रकार कोपरखैरणे येथे घडला आहे. यात एका ७१ वर्षीय जेष्ठ नागरिक महिलेच्या गळ्यातील आणि एका ३५ वर्षीय महिलेच्या गळ्यातील असे एकूण १३० ग्रॅम सोन्याची चोरी झाली आहे. या दोन्ही प्रकरणातील आरोपीचे वर्णन मिळते जुळते असल्याने आरोपी एकच असल्याची शंका पोलिसांनी आहे.

सुजाता वीर या आपल्या मैत्रिणी समवेत खारघर येथील महाराष्ट्र भूषण पुरस्कार वितरण समारंभास निघाल्या होत्या. कोपरखैरणे सेक्टर ६/७ च्या बस थांब्यावर त्या बसची वाट पाहत उभ्या असताना विरुद्ध



दिनेने एका दुचाकीवर दोघे युवक त्यांच्या जवळ आले आणि काही कळण्याच्या आत दोघा पैकी मागे बसलेल्या युवकाने त्यांच्या गळ्यातील ७० ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र बळजबरीने हिसकावून नेले. यावेळी त्या चोर चोर ओरडल्याही मात्र सकाळच्या वेळी गर्दी नसल्याने ते तरुण भरघाव वेगाने पळून जाण्यात यशस्वी ठरले. या बाबत तक्रार देण्यास त्या पोलीस ठाण्यात गेल्या असता त्या ठिकाणी असाच प्रकार ज्यांच्याशी घडला त्या सेलीन दासन याही आल्या होत्या.

सकाळी ७ वाजून ५० मिनिटांनी सुजाता यांची सोन साखळी चोरी झाली . या घटनेच्या पाच ते दहा मिनिटे पूर्वी सेक्टर बोनकोडे येथे या जेष्ठ नागरिक महिलेच्या गळ्यातील ६० ग्रॅम वजनाची सोन साखळी हिसकावून दुचाकीवरील दोघे पळून गेले. या दोन्ही प्रकरणातील आरोपींचे वर्णन मिळते जुळते असल्याने चोरटेही एकच असल्याचा संशय पोलिसांना आहे. या दोन्ही प्रकरणात मिळून ३ लाख ९० हजार रुपये किमतीच्या १३० ग्रॅम सोन्याच्या दोन साखळी चोरी झाल्या आहरेत. या दोन्ही प्रकरणी कोपरखैरणे पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# मोहोपाड्यामध्ये पावसाळ्यापूर्वीच्या कामांना गती

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पावसाळा जवळ येवू लागला की, एप्रिल महिन्याच्या मध्यानंतर मोहोपाड्यातील विज वितरण कार्यालयाकडून पावसाळयापुर्वीची कामे सुरू होतात. मोहोपाडा विजवितरणाचे उपअभियंता किशोर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मोहोपाडा रसायनी परिसरात पावसाळयापुर्वीची कामे युध्दपातळीवर सुरू आहेत.

आतापर्यंत विजवितरणाकडून परिसरातील विजवाहिन्यांना अडथळा ठरणाऱ्या फांद्या तोडण्यात



आल्या आहेत. यासोबतच मोहोपाडा, चांभार्ली, शिवनगर, काळणवाडी, दुर्गामाता, गणेशनगर, कांबे, पुष्पसंकुल, रिस, भटवाडी एचटी लाईनला अडसर ठरणाऱ्या झाडांच्या फांद्या तोडण्यात आल्या तर मेटनन्सचे कामही करण्यात आले. तसेच रिस टॅप एबी स्विच, रिस स्मशानभूमीजवळचा एबी स्विच मेंटनन्स करण्यात आले. तर कांबेपेटी कटपॉईंटचे रि–जम्परींगचे पावसाळ्यापुर्वीचे काम युध्दपातळीवर सुरू आहे. तसेच आसपासच्या परिसरातील लोंबकळत असलेल्या विज वाहिन्या खेचून व्यवस्थित करण्यात आल्या.

परिसरात झुकलेल्या विजवाहिन्या ट्रान्स्फरची कामे जोमात सुरू असल्याचे चित्र दिसून येते. ऐन पावसाळ्यात नागरिकांना त्रास होऊ नये, यासाठी मोहोपाडा विजवितरणाकडून सर्व कर्मचारी अथक परिश्रम घेत आहेत. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# मोहोपाड्यात गर्भाशय ग्रीवा कॅन्सर लसीकरण अभियान

## ९३ मुलींनी घेतला लाभ

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा, आर आय डिस्ट्रिक्ट ३१३१, जीविका हेल्थ केअर यांच्या संयुक्त विद्यमाने आणि दणेहार कंपनीने त्यांच्या सिएसआर फंडमधून दिलेल्या आर्थिक सहाय्याने गर्भाशय ग्रीवा मुखाचा कॅन्सर लसीकरण अभियान मोहोपाडा येथील महिला उद्योग मंडळाच्या प्राथमिक शाळेत सुरू करण्यात आले. पहिल्या दिवशी ९ ते १४ वर्ष या वयोगटातील एकूण ९३ मुलींचे लसीकरण करण्यात आले.

या लसीचे बाजार मूल्य ३९२७ रुपये इतके असून या सर्व मुलींना ही लस मोफत देण्यात आली. या



लसीकरणासाठी मुलींचे आधार कार्ड (जन्म तारीख तपासण्यासाठी) आणि पालकांचे संमती पत्र घेण्यात आले.

या वेळी झालेल्या औपचारिक उदघाटनाच्या कार्यक्रमाला महिला उद्योग मंडळाचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक वर्ग, विद्यार्थिनी, जीविका हेल्थ केअरची लसीकरण टीमचे सदस्य, रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाचे पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान, जीविका हेल्थ केअरतर्फे इर्शाद तांबोळी कार्यक्रम अधिकारी यांनी लसिकरणाबाबतच्या सर्व सूचना दिल्या. डॉ. धीरज जैन यांनी उपस्थित पालकांना या उत्तम लसीच्या परिणामकारकतेबद्दल आश्वस्थ केले. अरुण गायकवाड, रोटरीयन भावी अध्यक्षा रेश्मा कुरूप, रोटरीयन अध्यक्ष अमित शाह यांची भाषणे झाली.

लसीकरणासाठी डॉ. सौरभ मुनोत, राहुल दुधे, प्रमोद गढरी, मिस सीमा खरात, वनिता नाटकर, ज्योती गावित यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमास महिला उद्योग मंडळाच्या अध्यक्षा सरोजिनी साजवान, सचिव सुनंदा कुलकर्णी, तसेच रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाचे माजी अध्यक्ष गणेश काळे, सुनील कुरूप, बाळकृष्ण होनावळे व अनुराधा होनावळे उपस्थित होते.

# आरटीई प्रवेशासाठी पुरेसा कालावधी देणार असल्याचे जाहीर

**पनवेल : प्रतिनिधी**

आरटीई प्रवेशासाठी पालकांना पुरेसा कालावधी देणार असल्याचे शिक्षण विभागाने जाहीर केले आहे. त्यामुळे आरटीई प्रवेश पोर्टलवर येत असलेल्या तांत्रिक अडचणीमुळे घाबरून जाऊ नये. प्रवेशासाठी निवड झालेल्या कागदपत्रे सादर करण्यासाठी पुरेसा वेळ दिला जाणार असल्याने पालकांनी काळजी करू नये, असे शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी जाहीर केले आहे.

सन २०२३–२४ या शैक्षणिक वर्षासाठी आरटीई २५ टक्के प्रवेश प्रकिया सोडत पध्दतीने करण्यात येते. बुधवार ५ एप्रिल रोजी सोडत काढण्यात येऊन ज्या बालकांची निवड झाली आहे. त्यांच्या पालकांनी १३ एप्रिल ते २५ एप्रिलदरम्यान पंचायत समिती किंवा महापालिका स्तरावरील पडताळणी समितीकडे जाऊन कागदपत्रे तपासून आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करावयाचा होता, परंतु सद्य स्थितीत आरटीई २५ टक्के प्रवेश पोर्टलवर अतिरिक्त भार येत असल्याने तांत्रिक अडचणी येत असल्याच्या तक्रारी येत आहेत. त्या खऱ्या असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे पालकांनी कोणतीही शंका बाळगू नये.

ज्या बालकांची निवड सोडत प्रक्रियेने झाली आहे त्यांना शाळा प्रवेशासाठी पुरेसा कालावधी देण्यात येणार असल्याचे शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी पत्राद्वारे कळविले आहे.

# भेंडखळ ग्रामपंचायतीतर्फे विधवा व निराधार महिलांना आधार



**उरण : वार्ताहर, बातमीदार, प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील भेंडखळ ग्रामपंचायतीचे विद्यमान सरपंच मंजिता मिलिंद पाटील यांच्या प्रयत्नाने विधवा व निराधार महिलांना निधी वाटप करण्यात आला.

भेंडखळ ग्रामपंचायतीचे विद्यमान सरपंच मंजिता मिलिंद पाटील यांनी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर ग्रामपंचायतीच्या पहिल्या मासिक सभेत ग्रामपंचायतीचे उपसरपंच व सर्व सन्मानिय सदस्य यांना विश्वासात घेऊन भेंडखळ ग्रामपंचायत हद्दीत विधवा महिला करिता एक विशेष कार्यक्रम ग्रामपंचायतीच्या माध्यमातून राबवून त्यांना आर्थिक आधार मिळावा याकरीता ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाच्या १५ टक्के मागासवर्गीय इतर खर्चातून निधी वाटप करण्याचे ठरवले. त्यानुसार प्रत्येक विधवा महिलेस आर्थिक आधार मिळावा या उद्देशाने ग्रामपंचायतीच्या फंडातून सोमवारी (दि. १७) एक ऐतिहासिक उपक्रम राबवून ग्रामपंचायत हद्दीतील प्रत्येक विधवा महिलेस वार्षिक रक्कम ६००० रुपये इतकी रक्कम अनुदान रूपाने देऊन गावातील अशा एकूण १७२ विधवा व निराधार महिला वर्गाला गौरविण्यात आले.

या कार्यक्रमास सरपंच मंजिता मिलिंद पाटील, उपसरपंच संगीता मेघश्याम भगत, ग्रामपंचायत सदस्य अजित वासुदेव ठाकूर, दिपक दामोदर ठाकूर, अभिजित देवानंद ठाकूर, लिलेश्वर गजानन भगत, स्वाती महेंद्र घरत, सोनाली कौस्तुभ ठाकूर, शितल जीवन ठाकूर, स्वाती संतोष पाटील, अक्षता अनिल ठाकूर, प्राची गणेश पाटील व ग्रामविकास अधिकारी दिलीप महादेव तुरे, ग्रामपंचायत कर्मचारी सौ. निशा प्रफुल्ल वशेणीकर, हेमलता यशवंत मते उपस्थित राहून मोलाचे सहकार्य केले.

भेंडखळ ग्रामपंचायतीच्या माध्यमातून अनुदान उपलब्ध करून विधवा महिलांना आर्थिक आधार देणारी भेंडखळ ग्रामपंचायत ही रायगड जिल्ह्यामधील उरण तालुक्यातील पहिली ग्रामपंचायत ठरली आहे.

सरपंच पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर ग्रामपंचायतीचे उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांना विश्वासात घेऊन ग्रामपंचायतीच्या पाहिल्याच निर्णयाने दुर्बल घटकांना आधार मिळवून दिल्याबद्दल भेंडखळ ग्रामपंचायतीचे सर्व स्तरावरून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## अहिंसक संप्रेषण: भावनिक आरोग्याचा मार्ग

# सीकेटी महाविद्यालयात अतिथी व्याख्यान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज न्यू पनवेल (स्वायत्त) येथे अहिंसक संप्रेषण: भावनिक आरोग्याचा मार्ग या विषयावर अतिथी व्याख्यान बुधवारी (दि. १९) आयोजित केले होते.

या व्याख्यानासाठी प्रमुख पाहुणे एम. डी. (कम्यूनटि मेडिसीन) डॉ. दिपक पाटील आणि सहाय्यक संसाधन व्यक्ती म्हणून सल्लागार मानसोपचारतज्ज्ञ डॉ. शुभांगी डेरे (पाटील) उपस्थीत होते. या व्याखानासाठी विज्ञान शाखेच्या प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर, कला शाखेचे प्रमुख डॉ. बी. एस. पाटील, रुसा समन्वयक डॉ. एस. एन. वाजेकर, विज्ञान संघटनेचे प्रमुख प्रा. जी. एस. साठे व प्रज्ञा परिसर प्रकल्पच्या नोडल अधिकारी स्वाती परब यांनी उपस्थिती दर्शविली. तसेच सर्व शिक्षक आणि शिक्षेकेतर कर्मचारीदेखील उपस्थित होते.

महाविद्यालयाचे कला शाखेचे प्रमुख डॉ. बी. एस. पाटील यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. या नंतर विज्ञान विभागाची विद्यार्थिनी आर्ची पटेल हिने प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली तसेच कार्यक्रमाची प्रस्तावना इंग्रजी शाखा प्रमुख डॉ. आर. व्ही. येवले यांनी केली.

प्रमुख पाहुणे डॉ. दिपक पाटील यांनी अहिंसा संवादासाठी आपल्याला निरीक्षण, भावना व गरजा आवश्यक आहेत आणि ते एकमेकांशी जोडलेले आहेत असे सांगितले. त्यांनी या परिसंवादा मध्ये मला वाटते कारण मला गरज आहे , तुम्हाला वाटते कारण तुम्हाला गरज आहे असे विधान नमूद केले. तसेच वेगवेगळ्या भावना दर्शविण्यासाठी त्यांनी अभिनय सादर केला व संवादाचे वर्णन करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे खेळ घेतले.


या व्याख्याना अंतर्गत प्रश्न उत्तर सत्रदेखील घेण्यात आले. विज्ञान संघटनेचे प्रमुख प्रा. जी. एस. साठे यांनी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# आजपर्यंत १२ धरणांमध्ये अद्याप ५० टक्क्यांपेक्षा जास्त पाणीसाठा

## रायगडातील स्थिती : रानीवली धरणात कमी तर उसरणमध्ये जास्त साठा

**रोहे : प्रतिनिधी**

यावर्षी उन्हाळ्यात सातत्याने पारा चढत आहे. याचा परिणाम रायगड जिल्ह्यातील धरण क्षेत्रातील पाणीसाठ्यावर होत आहे. मागील पावसाळ्यात चांगला पाऊस पडल्याने अद्याप एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत सहा धरणांचा अपवाद वगळता उर्वरित २२ धरण क्षेत्रात पाणीसाठा चांगला आहे. परंतु उन्हाळ्यात पारा सातत्याने चढत असल्याने त्याचा परिणाम पाणीसाठ्यावर होताना दिसत आहे. अद्याप पाऊस सुरु होण्यास २ महिने शिल्लक आहेत. त्यामुळे येत्या दोन महिन्यात १५ जूनपर्यंत तरी पाणीसाठा उपलब्ध राहीला पाहिजे. याची काळजी घेण्याची आवश्यकता आहे.



रायगड जिल्ह्यात सर्वात कमी श्रीवर्धन तालुक्यातील रानीवली धरण क्षेत्रात १३ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे तर सर्वात जास्त पाणीसाठा ८० टक्के पनवेल तालुक्यातील उसरण धरण क्षेत्रात उपलब्ध आहे.

रायगड जिल्ह्यातील २८ धरण क्षेत्रापैकी १२ धरण क्षेत्रात अद्याप ५० टक्के पेक्षा जास्त पाणीसाठा उपलब्ध यामध्ये वावा धरण क्षेत्रात ६० टक्के, सुतारवाडी धरण क्षेत्रात ६१ टक्के, आंबेघर धरण क्षेत्रात ७८ टक्के,उन्हेरे धरण क्षेत्रात ६३ टक्के, पाभरे धरण क्षेत्रात ७५ टक्के, संदेरी धरण क्षेत्रात ५५ टक्के, वरंध धरण क्षेत्रात ५३ टक्के, खिंडवाडी धरण क्षेत्रात ५३ टक्के, कोथुर्डे धरण क्षेत्रात ६४ टक्के,कलोते मोकाशी धरण क्षेत्रात ५६ टक्के, मोरबे धरण क्षेत्रात ५३ टक्के,उसरण धरण क्षेत्रात ८० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. तर २८ धरण क्षेत्रापैकी ६ धरण क्षेत्रात ३५ टक्के पेक्षा कमी पाणी साठा उपलब्ध आहे यामध्ये फणसाड धरण क्षेत्रात २६ टक्के,श्रीगाव धरण क्षेत्रात २४ टक्के,ढोकशेत धरण क्षेत्रात ३२ टक्के,रानीवली धरण क्षेत्रात १३ टक्के,अवसरे धरण क्षेत्रात २७ टक्केडोणवत धरण क्षेत्रात ३१ टक्के या धरणाचा समावेश आहे.

मुरुड तालुक्यातील फणसाड धरण क्षेत्रात २६ टक्के पाणीसाठा उपलब्ध, तळा तालुक्यातील वावा धरण क्षेत्रात ६० टक्के, रोहा तालुक्यातील सुतारवाडी धरण क्षेत्रात ६१ टक्के, पेण तालुक्यातील आंबेघर धरण क्षेत्रात ७८ टक्के, अलिबाग तालुक्यातील श्रीगाव धरण क्षेत्रात २४ टक्के, सुधागड तालुक्यातील कोंडगाव धरण क्षेत्रात ४३ टक्के, घोटवडे धरण क्षेत्रात ३७ टक्के, ढोकशेत धरण क्षेत्रात ३२ टक्के, कवेळे धरण क्षेत्रात ४३ टक्के पाणीसाठा उपलब्ध, उन्हेरे धरण क्षेत्रात ६३ टक्के पाणीसाठा उपलब्ध, श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले धरण क्षेत्रात ४१ टक्के पाणीसाठा उपलब्ध, कुडकी धरण क्षेत्रात ४२ टक्के पाणी साठा उपलब्ध, रानीवली धरण क्षेत्रात १३ टक्के पाणीसाठा उपलब्ध, म्हसळा तालुक्यातील पाभरे धरण क्षेत्रात ७५ टक्के पाणीसाठा उपलब्ध, संदेरी धरण क्षेत्रात ५५ टक्के पाणीसाठा उपलब्ध, महाड तालुक्यातील वरंध धरण क्षेत्रात ५३ टक्के पाणीसाठा उपलब्ध, खिंडवाडी धरण क्षेत्रात ५३ टक्के पाणीसाठा उपलब्ध, कोथुर्डे धरण क्षेत्रात ६४ टक्के पाणीसाठा उपलब्ध, खैरे धरण क्षेत्रात ४२ टक्के पाणीसाठा उपलब्ध, कर्जत तालुक्यातील साळोख धरण क्षेत्रात ४३ टक्के पाणीसाठा उपलब्ध, अवसरे धरण क्षेत्रात २७ टक्के पाणीसाठा उपलब्ध, खालापूर तालुक्यातील भिलवले धरण क्षेत्रात ४४ टक्के पाणीसाठा उपलब्ध, कलोते मोकाशी धरण क्षेत्रात ५६ टक्के पाणीसाठा उपलब्ध, डोणवत धरण क्षेत्रात ३१टक्के पाणीसाठा उपलब्ध, पनवेल तालुक्यातील मोरबे धरण क्षेत्रात ५३ टक्के, बामणोली धरण क्षेत्रात ४२ टक्के पाणीसाठा उपलब्ध, उसरण धरण क्षेत्रात ८० टक्के पाणीसाठा उपलब्ध, उरण तालुक्यातील पुनाडे धरण क्षेत्रात ४० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

# नागोठणेजवळील सुकेळी येथे २२ हजारांचा अवैध गुटखा जप्त

**नागोठणे : बातमीदार**

अवैध गुटखा विक्रीला राज्यात बंदी असताना भरमसाठ आर्थिक फायद्यासाठी काहीजण नागोठणे शहर व विभागात गुपचूप गुटखा विक्री करत असल्याचे निर्देशनात आले आहे. नागोठणे विभागातील सुकेळी येथे सर्रास गुटखा विक्री केली जात असल्याचा प्रकार समोर आला असून सुकेळीनाका येथील भावेश दिलीप मोदी यांच्या मालकीच्या भावेश डिपार्टमेंट स्टोअर्स या किराणा मालाच्या दुकानात महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेल्या व नागरिकांच्या आरोग्यास अपायकारक असलेला २२ हजार रुपये किंमतीचा विमल गुटख्याचा साठा जप्त करण्यास स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा अलिबाग यांना १३ एप्रिल रोजी सायंकाळच्या सुमारास यश आले.

या बाबत नागोठाणे पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ५६/२०२३ भा. द. वि. स. कलम ३२८,१८८,२७२,२७३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अवैध गुटखा जप्त प्रकरणाला ५ दिवस उलटून गेले असले तरी आरोपी भावेश दिलीप मोदी (वय, २५) रा. वाकणफाटा ता. रोहा जि. रायगड व लोकेश बजाज ( वय, ५१ ) रा. उल्हासनगर जिल्हा ठाणे यांना नागोठणे पोलिसांकडून अद्याप अटक करण्यात आली नाही.

दोन वर्षांपूर्वी नागोठणे शहरातील दोन लहान व्यावसायीकांवर अन्न भेसळ विभाग पेण यांनी अवैध गुटखा विक्री प्रकरणात कारवाई केली होती तेव्हा या दोन आरोपीनां नागोठणे पोलिसांनी तात्काळ अटक केली होती व ते १६ दिवस पोलिस कोठडीत देखील अटक होते. परंतु त्याच प्रकरणातील आरोपी भावेश दिलीप मोदी यांस नागोठणे पोलिसांनी अद्याप अटक का केली नाही असा सवाल नागोठणेकर नागरिकांकडून केला जात आहे.

**आरोपी भावेश मोदी याची अटकपूर्व वैद्यकीय तपासणी केली असता भावेश हा अनफिट असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले असल्यामुळे त्याला तत्काळ अटक करण्यात आली नाही. जर आरोपी वैद्यकीय दृष्टीने अनफिट असेल व तो आरोपी पोलिसांना सहकार्य करत असेल तर त्याला अटक करण्याची गरज नाही. तशी वेळ आल्यास आरोपीला अटक देखील केली जाईल.**
**–राजन जगताप, नागोठणे पोलिस निरीक्षक**

**आरोपी भावेश मोदी यांस नागोठणे पोलिसांनी १३ एप्रिल रोजी रात्री दवाखान्यात चेकअपसाठी आणले होते त्यावेळी त्याच्या छातीत दुखत असल्याचे त्याने सांगितले. म्हणून मी त्याचा अनफिट रिपोर्ट दिला व पुन्हा उद्या सकाळी चेकअपसाठी घेऊन या असे पो.नि.राजन जगताप यांना सांगितले होते. वास्तविक पाहता दुसऱ्या दिवशी चेकअपसाठी आणणे गरजेचे असताना आजतागायत नागोठणे पोलिसांनी भावेश मोदी याला दवाखान्यात चेकअपसाठी आणले नाही असे नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.आदित्य सिरसाट यांनी सांगितले.**

# मुरुडजवळील मिठागर येथे नागाला मिळाले जीवनदान

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील २२ किलोमिटर अंतरावर असणारा मिठागर गावाजवळील कोलंबी तलावात अटकलेला साडेचार फुटीचा नागाला सर्पमित्र–संदिप घरत यांनी पकडुन दिले जीवदान



मिठागर येथील अनिकेत महाडिक यांच्या कोलंबी तलावात कामगारांना नाग साप दिसून आला. सापाला पळविण्याचा प्रयत्न करत होते परंतु संपूर्ण तलावाला प्लास्टिक असल्याने सापाला पळता येत नव्हते. शेवटी कामगारांनी अनिकेत महाडिक यांना कल्पना दिल्यावर मुरुड येथील सर्पमित्र संदिप घरत यांना फोन केला तात्काळ या ठिकाणी पोहचून नागाला शोधण्यास सुरुवात केली.

मशीनच्या प्लास्टिक कव्हरच्या आतमध्ये नाग असल्याचे आढळून आले. सर्पमित्र संदिप यांनी शिताफीने नागाला पकडण्यात आले. 'या नागाला त्वरित वन खात्यांच्या कर्मचारी यांची मदत घेऊन प्रादेशिक वन विभागाच्या हद्दीत मुक्तपणे सोडण्यात आले.

आज मिठागर येथील कोलंबी तलावातील कामगारांनी चांगलं काम केले. नागाला न मारता मला नाग पकडण्यासाठी याठिकाणी पाचारण केले आणि नागाला जीवदान दिले. या कामगाराचा आदर्श सर्वांनी घेतला पाहिजे.

नागरिकांनी सापाला न मारता मला त्वरित फोन केल्यास मी तातडीने पोहचून विनामूल्य सेवा देत असतो. जवळजवळ ३७ वर्ष हे काम करीत आहे. आता पर्यंत ३६ हजार पेक्षा जास्त विषारी व बिनविषारी साप पकडून त्यांना जंगलात सुरक्षित सोडल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

साप पकडण्याबरोबरच वन्यजीव रक्षण व जंगलाला लागणारे वणवे विझवण्यासाठीसुद्धा मी तत्पर काम करीत असल्याचे सर्पमित्र संदिप घरत यांनी सांगितले.

नाग हा विषारी असतो त्यामुळे त्या सापापासून सावधानगिरी बाळगावी, असे आवाहनही सर्पमित्राने केले.

# राजपुरी येथील जंजिरा किल्ला जेट्टीची पर्यटकांना प्रतीक्षा

**मुरुड : प्रतिनिधी**

तालुक्यातील राजपुरी ग्रामपंचायत हद्दीत असणारा सुप्रसिद्ध जंजिरा किल्ल्यावर देश विदेशातून येणाऱ्या पर्यटकांना किल्ल्यावर चढता व उतरताना सहज सोपे जावे यासाठी केंद्र शासनाच्या सागरमाला योजनेअंतर्गत जेट्टी बांधण्यासाठी ९३.५६ कोटी रुपये मंजूर झाले असून याची निविदा काढली आहे. सागरी मंडळाने या कामासाठी निविदा सुद्धा जारी केली असून नोव्हेंबर महिन्या निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन संबंधित ठेकेदारास हे काम दिले जाऊन लवकरच या किल्ल्यावर जेट्टीच्या कामाची सुरुवात होईल अशी माहिती महाराष्ट्र मेरी टाइम बोर्डातील वरिष्ठ अधिकारी सुधीर देवरे यांनी दिली आहे. हे काम दोन वर्षात पूर्ण करण्याचा मानस यावेळी व्यक्त करण्यात आला आहे.



जंजिरा किल्ल्यावर पर्यटकांना सुखरूप किल्यावर उतरण्यासाठी जेट्टीची खूप आवश्यकता होती.तशी मागणी हि वेळोवेळी करण्यात आली होती. कारण जेव्हा किल्ल्यावर पर्यटक जात असत जर त्यावेळी भरतीची वेळ असेल तर किल्ल्याच्या पुढील भागात दर्शनी दरवाज्याजवळ उतरावे लागत असे अश्या वेळी शिडाच्या बोटींमधून उतरताना बोट हेलकावे खात असत त्यामुळे विशेषतः महिलांना व लहान मुलांना उतरवताना बोट धारकांना तारेवरची कसरत करावी लागत असे अश्यावेळी अपघात सुद्धा घडलेले आहेत. सुरुवातीला किल्ल्याच्या दर्शनी भागावरच जेट्टी बांधण्याचे प्रयोजन करण्यात आले होते.परंतु दर्शनी दरवाज्याजवळ लाटांचा खूप जोरदार मारा असल्याने येथे जेट्टी टिकू शकणार नाही हे तद्न्य तांत्रिक वर्गानी सांगितल्यावर किल्ल्याच्या मागील बाजूचा विचार करण्यात आला.किल्ल्याच्या मागील बाजूस लाटांचा मारा नसून येथील समुद्राचे पाणी शांत असल्याने येथे जेट्टी होण्यास शक्य असल्याने सदरील जागेची निवड केल्यावर महाराष्ट्र मेरी टाइम बोर्डाकडून तसा प्रस्ताव पुरातत्व खात्याकडे पाठवण्यात आला.प्रस्ताव योग्य असल्याने पुरातत्व खात्याने सुद्धा मंजुरी दिली आहे.

५०० पर्यटक सुरक्षित उतरतील अशी भव्य जेटी बनणार व समुद्राच्या लाटांचा प्रभाव कमी करण्यासाठी २५० फूट लांबीचा ब्रेकवॉटर ( भित ) ९३.५६ कोटी खर्चून बनवण्यात येणार आहे अशी माहिती मेरीटाईम बोर्डाचे अधिकारी सुधीर देवरे यांनी दिली होती.

मे महिना जवळ येऊन सुधा जेट्टीच्या कामास सुरुवात झाली नाही. त्यामुळे यंदा तरी काम सुरू होणार का असा सवाल पर्यटक विचारत आहेत.अजूनपर्यंत या जेत्तीच्या कामाचे भूमिपूजन न झाल्याने या कामाचा मुहरत कधी सापडणार असाच सवाल सर्व पर्यटक विचारत आहेत नोव्हेंबर महिन्यात निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन सुधा जंजिरा किल्ल्यावरील जेट्टी साठी लागणारा एक दगड सुधा न हलल्याने खरोखर या जेट्टीचे काम होईल किंवा नाही असाच सवाल सर्वांच्या मनात निर्माण होत आहे.

जंजिरा किल्ल्यावर दरवर्षी साडेपाच लाख पर्यटक येतात मागील दोन वर्षापासून जेत्तीचे काम होणार म्हणून सांगण्यात येत आहे परंतु अजुनपर्यंत काम सुरू होत नसल्याने पर्यटक ीं स्थानिक नागरिकांकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

# मुरुड शहरात श्रीसंत गोरा कुंभार पुण्यतिथी साजरी; कार्यक्रमांना प्रतिसाद

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड शहरातील कुंभारवाडा येथील संत शिरोमणी गोरा कुंभार समाजातर्फे श्रीसंत गोराकुंभार यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी समाज अध्यक्ष अरुण म्हसळकर, उपाध्यक्ष नितीन राजपुरकर , महिला अध्यक्ष गिता म्हसळकर, अनंत म्हसळकर, विजया म्हसळकर, सुलभा राजपुरकर, दिपेश राजपुरकर, संदिप राजपुरकर, दिलीप धाटावकर, वर्षा राजपुरकर, सचिन बिरवाडकर, दिपक म्हसळकर, रवींद्र तळेकर, सुदेश राजपुरकर, दत्तात्रेय राजपुरकर, अनिक्षा म्हसळकर, शशिकांत बिरवाडकर आदिंसह समाज बांधव भगिनी उपस्थित होत्या.



सकाळी श्रीसंत गोरा कुंभार यांच्या प्रतिमेला दत्तात्रेय राजपुरकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण पुजन व अभिषेक करण्यात आले. पोथी पुजन व वाचन शशीकांत बिरवाडकर यांच्याकडुन करण्यात आले. तर माहिती अशोक भोसले यांनी दिली. तदनंतर श्रीसंत गोरा कुंभार महाराजांच्या चरित्रावर भजन कीर्तन गायन करण्यात आले.

यावेळी समाज उपाध्यक्ष नितिन राजपुरकर यावेळी मार्गदर्शन करताना म्हणाले की ५५वर्ष संत गोरा कुंभार पुण्यतिथी आम्ही उत्साहात साजरी करीत आहोत. संत शिरोमणी गोरोबा काका यांनी समाजासाठी खुप त्याग करुन कुंभार समाजाला बहुमान प्राप्त करुन दिला जिथे स्वच्छता, भाविक आणि उत्साह असतो अशाच ठिकाणी संतांच वास्तव्य असत. कवडीमोल मातीला सर्वोच्च ठिकाणी बसविण्याचे महत्वाचे काम माझा कुंभार समाज बांधवच करु शकतो याची अनेक उदाहरणे देता येतील असे अभिमानाने नितीन राजपुरकर यांनी सांगितले.

यावेळी समाज बांधव व भगिनी यांच्या शुभ हस्ते गुणवंत विद्यार्थांना शालेय गिफ्ट व प्रशशिस्त पत्र देऊन सत्कार करण्यात येते. यावेळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# माणगावमध्ये चोरीला गेलेले पाच लाख केले परत

## रक्कम मिळाल्याने मालकाच्या चेहऱ्यावर आनंद

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगांवमध्ये झालेला रॉबरीचा गुन्हा माणगांव पोलीसांनी कांही दिवसात उघडकीस आणला असून आपल्याच नोकराने कलेक्शन करून आणलेली रक्कम चोरट्यांनी चोरी केल्याचा बनाव करून हडप करण्याचा प्रयत्न केला होता. त्याबाबत माणगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

माणगाव पोलिसांनी तपास पूर्ण करून गुन्ह्यात चोरीला गेलेली ५,५७,२९९/– रुपयाची रक्कम हस्तगत करून न्यायालयापुढे ठेवली ती रक्कम न्यायालयाच्या आदेशाने मूळ मालक खेमचंद उर्फ विजयशेठ मेहता यांच्या पत्नी ज्योती मेहता व मुलगा मनीष मेहता यांच्याकडे पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या हस्ते देण्यात आली. त्यावेळी मूळ मालकाच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.



प्रथम प्रभाकर पारावे वय २१ वर्षे, धंदा नोकरी रा. चिंचवलीवाडी, पो. गोरेगाव, यशगौरव कार्पोरेशन, तळेगाव, यांचे राईस मिलचे पैसे कलेक्शन करणेकरीता म्हसळा येथील व्यापारी, दुकानदार यांचेकडे गेला असता त्यास ता. ३१ मार्च २०२३ रोजी संध्याकाळी ०५.३० वा. चे सुमारास मोर्बा घाटामध्ये त्यांचे ताब्यातील अँटिव्हा स्कुटरवर जात असताना त्याचे मागुन अचानक एक पांढरे रंगाची मारूती स्वीफट गाडी नंबर नसलेली यावरील चालकाने स्कुटीला ओव्हरटेक करून, स्कुटीला आडवी लावुन थांबविली व कारमधुन अनोळखी तीन लोक उतारले व त्याचे पाठीवर असलेली लाल व निळया रंगाची बॅग व त्यामध्ये असलेले ५,५७,३३९/– रोख रकमेसह जबरदस्तीने खेचुन चोरी करून पळुन गेले बाबत प्रथम प्रभाकर पारावे याने तक्रार दिली होती.

हा गुन्हा घडल्यानंतर पोलिसांनी वेगवेगळ्या ठिकाणी सिसिटीव्ही व तांत्रिक तपास करीत असताना पोलिसांना फिर्यादी प्रथम प्रभाकर पारावे याचेबाबत संशय निर्माण झाला होता. त्यामुळे त्यास विश्वासात घेवुन तपास केला असता फिर्यादी प्रथम प्रभाकर पारावे वय २१ वर्षे, धंदा– नोकरी रा. चिंचवलीवाडी, पो. गोरेगाव याने लालसेपाटी व गाडी खरेदी करण्याची असल्याने सदर गुन्हयाचा बनाव केलेबाबत सांगितले. गुन्हयामध्ये चोरीस गेलेली रक्क्कम ५,५७,२९९ /– रू फिर्यादी प्रथम प्रभाकर पारावे याचेकडुन हस्तगत करण्यात आली होती. त्यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक सतिश अस्वर, सहा. फौजदार कुवेसकर, मगर पो. ह. प्रशांत पाटील, महिला पो. ह. प्रीती उमले, महिला पोलीस नायिक धनावडे, पोलीस खिरीट, डोईफोडे, विनय पाटील, शिंदे, पोंडे, श्री. मोरे, श्री. मदने आदी पोलीस कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

# विघवली, कशेणे वळण धोकादायक

## वर्षभरात झाले दहा पेक्षाही अधिक अपघात

**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई गोवा महामार्गाचे काम संथ गतीने होत असतानाच प्रवाशांना या मार्गावरून प्रवास करताना मोठ्या गैर सोयीना सामोरे जावे लागते आहे. खड्डे, धूळ अनेक ठिकाणी दिलेली वळणे यामुळे अपघात होत आहेत. यातच इंदापूरपासून माणगावकडे जात असताना कशेणे गाव ते विघवली गावाच्या मध्यावर पेट्रोल पंपाशेजारी असलेले वळण जीवघेणे ठरत आहे. गेल्या काही दिवसांपासून या वळणावर अपघातांचे प्रमाण वाढले आहे. हलक्या व अवजड वाहनांचे १० हून अधिक अपघात या वळणावर झाले आहेत.

कशेणे येथे मुंबई गोवा महामार्ग बाह्यवलन दिले आहे. इंदापूर कडून जाणारा रस्ता या ठिकाणी मोठ्या वळणाचा आहे.



या वळणावरील रस्ता खडबडीत असून मुख्य रस्त्यातला उतार आहे व तो पक्का सिमेंट काँक्रेटचा आहे .यामुळे गतीत येणारे वाहन वळणावर नियंत्रित होत नाही .याचा परिणाम या ठिकाणी वारंवार अपघात होत आहेत. अवजड वाहने घसरून मोठे नुकसान होत आहे .आजपर्यंत येथे मोठे ट्रेलर ,वायू वाहून नेणारे टँकर व अधिक अवजड वाहनांचे अपघात जास्त झाले आहेत. सुदैवाने जीवित हानी झाली नसली तरी वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. या ठिकाणी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थ व प्रवाशांनी केली आहे.

**गेल्या काही दिवसांपासून या वळणावर अनेक अपघात होत आहेत. वळण असल्याने या ठिकाणी वाहने नियंत्रित होत नाही. वळणामुळे अपघात होत आहेत. या ठिकाणी गतिरोधक किंवा सूचना फलक आवश्यक आहे.**
**–सचिन उभारे,**
**स्थानिक ग्रामस्थ.**

# मुंबई इंडियन्सची हॅट्ट्रिक

## हैदराबादवर १४ धावांनी रोमांचक विजय

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

राजीव गांधी क्रिकेट स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या आयपीएलच्या २५व्या सामन्यात मंगळवारी मुंबई इंडियन्सने हैदराबादचा १४ धावांनी पराभव करीत विजयाची हॅट्ट्रिक नोंदवली.

हैदराबादसमोर विजयासाठी १९३ धावांचे लक्ष्य होते, परंतु संपूर्ण संघ १९.५ षटकांत १७८ धावांत बाद झाला. हैदराबादला शेवटच्या षटकात २० धावांची गरज होती, पण अर्जुन तेंडुलकरने केवळ चार धावा दिल्या. त्याने आपल्या आयपीएल कारकिर्दीतील पहिली विकेटही घेतली. २०व्या षटकाच्या पाचव्या चेंडूवर त्याने भुवनेश्वर कुमारला कर्णधार रोहित शर्माकरवी झेलबाद केले. हैदराबादकडून मयंक अग्रवालने सर्वाधिक ४८ तर हेनरिक क्लासेनने १६ चेंडूत ३६ धावांची स्फोटक खेळी केली. तत्पूर्वी, नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना मुंबई इंडियन्सने कॅमेरून ग्रीनच्या ६४ आणि इशान किशनच्या ३८ धावांच्या जोरावर पाच गडी गमावून १९२ धावा केल्या.



प्रथम फलंदाजी करताना मुंबईने सनरायझर्स हैदराबादसमोर १९३ धावांचे लक्ष्य ठेवले होते. मुंबईकडून कॅमेरून ग्रीनने सर्वाधिक ६४ धावांची खेळी खेळली. ग्रीनशिवाय तिलक वर्माने १६ चेंडूत ३७ धावा केल्या. तत्पूर्वी, रोहित शर्मा आणि इशान किशन यांनी मुंबईच्या डावाची सुरुवात केली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी ४.४ षटकात ४१ धावा जोडल्या. यादरम्यान रोहित शर्माने आयपीएल कारकिर्दीतील सहा हजार धावा पूर्ण केल्या.

ग्रीन आणि इशान किशन यांनी दुसऱ्या विकेटसाठी ४६ धावांची भागीदारी केली, पण किशनचे अर्धशतक हुकले. मार्को जॅनसेनने ३८ धावांवर त्याला बाद केले. मुंबईला तिसरा धक्का सूर्यकुमार यादवच्या रूपाने बसला जो सात धावा काढून बाद झाला. तिलक वर्मा आणि ग्रीन यांनी चौथ्या विकेटसाठी झटपट ५६ धावा जोडल्या, पण १६ चेंडूत ३७ धावांची स्फोटक खेळी खेळल्यानंतर तिलक भुवनेश्वर कुमारच्या चेंडूवर मयंक अग्रवालच्या हाती झेलबाद झाला.

# रायगड प्रीमियर लिगमध्ये रायगड वॉरियर्स अंतिम विजयी




**अलिबाग : प्रतिनिधी**

कुरुळ येथील आरसीएफच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या २५ वर्षांखालील रायगड प्रीमियर लिग टी-२० क्रिकेट स्पर्धेत रायगड वॉरियर्स संघ अंतिम विजयी ठरला, तर जंजिरा चॅलेंजर्स उपविजेता ठरला.

अंतिम सामन्याचा सामनावीर म्हणून अष्टपैलू खेळाडू अजिंक्य रसाळ, सिद्धार्थ म्हात्रेला मालिकवीर व उत्कृष्ठ फलंदाज तर अजिंक्य रसाळ याला स्पर्धेतला सर्वांत मौल्यवान खेळाडू व उत्कृष्ट गोलंदाज म्हणून गौरविण्यात आले.

अतिशय अटीतटीच्या झालेल्या अंतिम सामन्यात रायगड वॉरियर्स संघाच्या अजिंक्य रसाळ व जंजिरा चॅलेंजर्स संघाचा सिद्धार्थ म्हात्रे यांनी अष्टपैलू खेळ करून उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. शेवटच्या षटकापर्यंत रंगलेल्या अंतिम सामन्यात रायगड वॉरियर्स संघांनी जंजिरा चॅलेंजर्स संघावर पाच गडी राखून विजय मिळवला.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला आलेल्या जंजिरा चॅलेंजर्स संघांनी २० षटकांमध्ये आठ गडी गमावत १३३ धावा केल्या. सिद्धार्थ म्हात्रेने सर्वाधिक ४१ व अनिकेत गदमळे यांनी २८ धावा काढल्या. जंजिराकडून अजिंक्य रसाळ, भावेश कुरुंगळे यांनी प्रत्येकी दोन फलंदाज बाद केले. १३४ धावांचे लक्ष घेऊन फलंदाजीला आलेल्या रायगड वॉरियर्स संघाचे सलामीचे फलंदाज लवकर बाद झाल्यानंतर मधल्या फळीत अजिंक्य रसाळ यांनी एकाबाजून टक धरून चौफेर फटकेबाजी करीत नाबाद ४० धावा केल्या, तर दुसऱ्या बाजूने राहुल भोईर यांनी २९ धावा काढल्या. शेवटचे दोन षटक शिल्लक असताना २२ धावांची गरज संघाला होती. भावेश कुरुंगळे आणि हार्दिक कुरुंगळे यांनी १५ धावांची खेळी केली.

शेवटच्या षटकात सामन्याचा षटकार मारून रायगड वॉरियर्स संघांनी निकाल लावला. जंजिरा चॅलेंजर्स संघाला सलग दुसऱ्या वर्षीच्या पर्वातसुद्धा उपविजेता संघ म्हणून समाधान मानावे लागले.

स्पर्धा आमदार महेंद्र दळवी यांनी पुरस्कृत केली होती. संपूर्ण स्पर्धा ड्रिम्स क्रिकेट युट्यूबच्या माध्यमातून लाईव्ह दाखवण्यात आली तर क्रिक हिरोजवर बॉल टू बॉल लाईव्ह स्कॉर पाहता आला. बक्षीस वितरणासाठी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे कार्यध्यक्ष प्रदिप नाईक, आदिती अभिराज दळवी, आरडीसीए सचिव संजय तावडे, आरसीएफच्या क्रीडा विभागाचे प्रमुख पांडुरंग सोनार, आरपीएलचे अध्यक्ष राजेश पाटील, सचिव जयंत नाईक, कौस्तुभ जोशी, डॉ. राजाराम हुलवान, संदेश गुंजाळ, पंच प्रशांत माळी व प्रितम पाटील, संदीप जोशी, ॲड. पंकज पंडित, योगेश ठाकूर, हुसेन तांबोळी, आदेश नाईक समालोचक यासिन मर्चंट, संदीप जगे यश मापगावकर, निखिल पडते, रायगड वॉरियर्स संघमालक यशवंत साबळे प्रशिक्षक शंकर दळवी, उपविजेता संघ जंजिरा चायलेंजर्स संघमालक सचिन राऊळ प्रशिक्षक उमाशंकर सरकार उपस्थिती लावली होती.

# दिल्ली कॅपिटल्सच्या खेळाडूंच्या किटमधून वस्तूंची चोरी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२३मध्ये, सर्वात वाईट स्थितीत असलेल्या दिल्ली कॅपिटल्स संघाच्या फलंदाजांची बॅट, पॅड, हातमोजे आणि शूज चोरीला गेले आहेत. याप्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे विदेशी खेळाडूंच्या बॅटचीही चोरी झाली असून, प्रत्येक बॅटची किंमत एक लाख रुपयांपर्यंत आहे. दिल्ली कॅपिटल्सच्या फलंदाजांच्या १६ बॅट्स चोरीला गेल्या आहेत.



इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, बंगळुरूमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध सामना खेळल्यानंतर जेव्हा दिल्ली कॅपिटल्सचे खेळाडू दिल्लीला पोहोचले. त्यानंतर त्यांच्या किट बॅग त्यांच्यापर्यंत पोहोचल्या, तेव्हा त्यांना धक्काच बसला. कर्णधार डेव्हिड वॉर्नरच्या तीन बॅट्स, मिचेल मार्शच्या दोन बॅट्स, फिल सॉल्टच्या तीन आणि यश धुलच्या पाच बॅट्स चोरीला गेल्या आहेत. याशिवाय काहींचे पॅड, काहींचे ग्लब्ज, काहींचे शूज आणि क्रिकेटचे इतर साहित्य दिल्लीत पोहोचले नाही. दिल्ली कॅपिटल्स फ्रँचायझीने याप्रकरणी तक्रार दाखल केली आहे.

दिल्ली कॅपिटल्सने मंगळवारी सराव सत्र आयोजित केले. काही फलंदाजांनी त्यांच्या एजंटशी संपर्क साधला आणि त्यांच्या बॅट कंपन्यांना पुढील सामन्यापूर्वी काही बॅट पाठवण्याची विनंती केली. परदेशी खेळाडूंना त्यांच्यासारखी बॅट एवढ्या लवकर मिळणे अवघड आहे, पण विदेशी बॅट बनवणाऱ्या कंपन्याही भारतात आहेत. त्यामुळे त्यांना येथे बॅट मिळू शकतात, त्यासाठी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

## आशियाई चॅम्पियन्स हॉकी प्रथमच भारतात होणार

**चेन्नई : वृत्तसंस्था**

भारतामध्ये पहिल्यांदाच आशियाई हॉकी चॅम्पियन्स ट्रॉफीचे आयोजन करण्यात येणार आहे. चेन्नईमध्ये ३ ते १२ ऑगस्ट या दरम्यान ही स्पर्धा पार पडणार आहे. चेन्नईमध्ये तब्बल १६ वर्षांनंतर आंतरराष्ट्रीय लढती खेळवण्यात येणार आहेत.

तामिळनाडूचे क्रीडामंत्री उदयानिधी स्टॅलीन या वेळी म्हणाले, चेन्नईमध्ये याआधी स्थानिक व आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे चेन्नईला दक्षिण भारतातील हॉकी या खेळाचे माहेरघर म्हणून ओळखले गेले. आता आशियाई हॉकी चॅम्पियन्स ट्रॉफीचे आयोजन करायला मिळत आहे. त्याचा आम्हाला अभिमान आहे.

# मोहम्मद सिराजशी सट्टेबाजाने साधला संपर्क

## बीसीसीआयकडे तक्रार; एकाला अटक



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२३मध्ये फिक्सिंगचे प्रकरण समोर आले आहे. हे प्रकरण रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचा वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजशी संबंधित आहे. रिपोर्टनुसार, एका ड्रायव्हरने फोनद्वारे मोहम्मद सिराजशी संपर्क साधला आणि त्याला रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाची अंतर्गत माहिती देण्यास सांगितले. सिराजने ही माहिती बीसीसीआयच्या अँटी करप्शन युनिटला दिली आहे.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजने बीसीसीआयला धक्कादायक माहिती दिली आहे. आयपीएलवर सट्टा लावणाऱ्या एका ड्रायव्हरने सट्ट्यात पैसे गमावल्यानंतर मोहम्मद सिराजशी संपर्क साधला. या वेळी त्याने सिराजला, 'जर तू मला संघासंबंधी अंतर्गत माहिती दिली, तर मोठी रक्कम देऊ शकतो' अशी ऑफर दिली, मात्र सिराजने याची संपूर्ण माहिती बीसीसीआयच्या भ्रष्टाचारविरोधी विभागाला दिली आहे.

या घटनेनंतर बीसीसीआयने मोहम्मद सिराजशी संपर्क साधणाऱ्या व्यक्तीवर तत्काळ कारवाई करीत अटक करण्यात आली आहे. तो हैदराबादचा एक चालक आहे, जो सामन्यांवर सट्टा लावतो. त्याने सट्टेबाजीत बरेच पैसे गमावले होते. यामुळे त्याने संघातील अंतर्गत माहिती मिळवण्यासाठी सिराजशी संपर्क साधला होता. सिराजने तत्काळ बीसीसीआयला या संपूर्ण प्रकाराची माहिती दिली, असे बीसीसीआयच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले आहे.

# अर्जुन तेंडुलकरच्या कामगिरीचे शाहरुख खानकडूनही कौतुक

**मुंबई : प्रतिनिधी**

टीम इंडियाचा माजी दिग्गज फलंदाज सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुन तेंडुलकरने इंडियन प्रीमियर लीगच्या रविवारच्या टी-२० सामन्यात पदार्पण केले. मुंबई इंडियन्सने सनरायझर्स हैदराबादचा पराभव केला. या सामन्यावेळी अर्जुन तेंडुलकरच्या गोलंदाजीने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. अर्जुनने शेवटच्या षटकात दोन विकेट घेतल्या. त्यामुळे सर्वत्र त्याचे कौतुक पाहायला मिळत आहे. नुकतेच अभिनेता शाहरुख खानने याबद्दल ट्वीट केले आहे.

अर्जुन तेंडुलकरने कोलकाता नाईट रायडर्स या संघाविरुद्ध आयपीएलमध्ये पदार्पण केले. त्यानंतर काल झालेल्या सनरायझर्स हैदराबाद विरुद्धच्या अर्जुनने शानदार गोलंदाजी केली. शाहरुख खानने त्याच्यासाठी खास ट्वीट करून पदार्पणासाठी शुभेच्छाही दिल्या आहेत.

# दिव्यांग खेळाडूंसाठी सुविधा उपलब्ध कराव्यात -मुख्यमंत्री




**मुंबई : प्रतिनिधी**

दिव्यांग खेळाडूंना सराव करण्यासाठी महानगरपालिकांच्या मैदानांवर आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी (दि. १९) दिले.

मंत्रालयाच्या त्रिमूर्ती प्रांगणात आयोजित राज्य शासन, मुंबई महानगरपालिका व प्रोजेक्ट मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित समावेश-मेकिंग मुंबई इनक्ल्युझिव्ह मोहिमेचा शुभारंभ मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. त्या वेळी शिंदे बोलत होते. या वेळी दिव्यांगांना व्हिलचेअरचे वितरण करण्यात आले, तसेच त्यांच्या बास्केटबॉलचा विशेष सामनाही या वेळी झाला.

कार्यक्रमास शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, महिला व बालविकास मंत्री तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, राज्य उत्पादन शुल्कमंत्री शंभूराज देसाई, बंदरे व खनिकर्म मंत्री दादाजी भुसे, सहकार मंत्री अतुल सावे, मुंबई महानगरपालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल, दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव अभय महाजन, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि प्रोजेक्ट मुंबई उपक्रमाचे संस्थापक शिशिर जोशी यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, दिव्यांग खेळाडूंना क्रीडा साहित्य, व्हिलचेअर वितरणाचा आजचा उपक्रम स्वागताहार्य आहे. दिव्यांग खेळाडूंना इतर सर्व खेळाडूंप्रमाणे समान संधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासन आग्रही आहे, असे त्यांनी सांगितले.

व्हिलचेअरवर बसून अतिशय चपळाईने एकामागोमाग एक या खेळाडूंनी बास्केटमध्ये बॉल फेकत उत्कृष्टपणे आपल्या क्रीडा कौशल्याने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासह उपस्थितांच्या टाळ्या आणि कौतुक घेतले.

या वेळी या खेळाडूंसोबत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी संवाद साधून त्यांची चौकशी केली. आर्यन ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजतर्फे उद्योजक जगताप यांनी मुख्यमंत्री सहाय्यता कल्याण निधीसाठी ५१ कोटी आणि पोलीस कल्याण निधीसाठी २५ कोटी असे दोन धनादेश दिले.

# हरमनप्रीत टॉप-५ क्रिकेटर्सपैकी एक; सूर्याही टी २० प्लेअर ऑफ द इयर



**मुंबई : प्रतिनिधी**

विस्डन क्रिकेटर्स अल्मनॅकने वर्षातील टॉप-५ क्रिकेटर्सची यादी जाहीर केली आहे. त्यात भारताच्या महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरचा देखील समावेश आहे.

या यादीत कौर व्यतिरिक्त टॉम ब्लंडेल (न्यूझीलँड), बेन फोक्स (इंग्लंड), डॅरिल मिशेल (न्यूझीलँड) आणि मॅथ्यू पॉट्स (इंग्लंड) यांचीही नावे आहेत. इतकेच नाही तर धडाकेबाज फलंदाज सूर्यकुमार यादवची टी-२० क्रिकेटर ऑफ द इयर म्हणून निवड झाली आहे. या प्रतिष्ठित यादीत स्थान मिळवणारी हरमनप्रीत कौर ही भारतातील पहिली महिला क्रिकेटपटू ठरली असून १८८९पासून विस्डेन दरवर्षी ही यादी प्रसिद्ध करीत आहे.

याशिवाय इंग्लंडच्या बेन स्टोक्सची पुरुष खेळाडूंमध्ये २०२२-२३ या वर्षासाठी जगातील सर्वोत्तम क्रिकेटपटू म्हणून निवड करण्यात आली आहे. त्याचबरोबर महिला क्रिकेटपटूंमध्ये बेथ मुनीला हा पुरस्कार मिळाला आहे, तर सूर्यकुमार यादवची टी-२० क्रिकेटर ऑफ द इयर म्हणून निवड झाली आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com